Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १९४ * * नागपूर *
सोमवार, दिनांक २१ ऑक्टोबर २०२४
८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## राज्यातील मतदारसंघात मतदार यादीत भाजपचा घोळ

**महासागर प्रतिनिधी नागपूर , २० :**
महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीत होणारा पराभव स्पष्ट दिसू लागल्याने मतदार याद्यात घोळ केल्याचा आरोप पराभूत मानसिकतेमधून केला जात असल्याचा दावा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. एरव्ही ईव्हीएमवर बोलणारे मविआचे नेते आता मतदार यादीवर बोलू लागले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. ते नागपूरच्या कोराडी येथे माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते.
चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महाविकास आघाडीमध्ये वाद असून केवळ भाजपा आणि महायुतीचा विरोध करण्यासाठी एकत्र आले आहेत.

अग्रलेख **खरीखरी...**

## भाजपचे काही छक्के, थोडे धक्के

भारतीय जनता पक्षाने नेहमीप्रमाणे आघाडी घेऊन आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केलेली आहे. सेंच्युरी मारण्यासाठी एक धाव बाकी असताना फलंदाज कधीकधी बाद होतो. म्हणून भारतीय जनता पक्षाने या पहिल्या यादीत अनेक छक्के मारलेले आहेत. तर थोडे बहुत धक्केही दिलेले आहेत. भारतीय जनता पक्ष हे पक्के जाणून आहे की, आपले जे जे एक्के आहेत. ते निदान चौके तरी मारतील आणि पक्षाला विजय मिळवून देतील. त्यामुळे या यादीत बहुतांश जुन्याच आमदारांना तिकिटे देण्यात आलेली आहेत. फारसा विचार केलेला नाही. या यादीमध्ये भारतीय जनता पक्षाने उमेदवार बदलण्याची कसरत केलेली नाही. वास्तविक पाहता भारतीय जनता पक्षाला उमेदवार बदलण्याची आणि उमेदवारांना किंवा मतदारांना धक्का देण्याची जुनी सवय आहे. पण आता कसेही करून आपल्या उमेदवाराला कोणी विरोध करू नये. म्हणून ज्या ज्या विद्यमान आमदारांची कामगिरी लक्षणीय आहे. त्यांना बदलण्याकडे भारतीय जनता पक्षाच्या पक्षश्रेष्ठींनी स्वारस्य दाखवलेले नाही. या यादीत जे जे चेहरे बदलण्यात आलेले आहेत. त्यात भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे नाव आघाडीवर आहे. गेल्या निवडणुकीत मुद्दाम ठरवून शेवटपर्यंत बावनकुळे यांच्या नावाबाबत संभ्रम कायम ठेवण्यात आला होता आणि शेवटी त्यांना तिकीट न देता त्यांच्या चेल्याला तिकीट देण्यात आले होते. आता बावनकुळे यांनी तिकीटवापसी केलेली आहे. गोंदिया शहरात गेल्यावेळी काँग्रेसच्या आमदाराने भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती आणि भाजपच्या कार्यकर्त्याने त्यांच्याविरुद्ध अपक्ष अर्ज भरला होता. त्या विनोद अग्रवाल यांना भाजपने पुन्हा तिकीट दिले आहे. नागपूर शहरातील माजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मोहन माते आणि कृष्णा खोपडे यांना तिकीट देण्यास उशीर केलेला नाही. बल्लारपुरातून भारतीय जनता पक्षाचे बडे नेते सुधीर मुनगंटीवार यांनाही तिकीट देण्यात आलेले आहे. त्याचबरोबर चिमूरचे बंटी भांगडिया यांचेही तिकीट कायम ठेवण्यात आलेले आहे. गिरीश महाजनही आपल्या तिकिटावर कायम आहेत. मुंबईतील राम कदम, पराग अळवणी आशिष शेलार, मंगल प्रभात लोढा राहुल नार्वेकर यांच्या उमेदवाऱ्या जशाच्या तशा ठेवण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे आशिष शेलार यांचे सख्खे भाऊ विनोद शेलार यांना मालाड पश्चिम मधून निवडणुकीच्या मैदानात उतरवलेले आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याविरुद्ध परंपरागत त्यांचे विरोधी अतुल भोसले मैदानात आहेत. नव्या उमेदवारांपैकी भोकर मधून अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण, तसेच भोकरदन मधून माजी भाजपाध्यक्ष आणि मंत्री रावसाहेब दानवे यांचे पुत्र संतोष दानवे यांना तिकीट देण्यात आलेले आहे. श्रीगोंदा येथून बबनराव पाचपुते यांच्या पत्नींना तिकीट देण्यात आलेले आहे. थोडक्यात भारतीय जनता पक्षाने हमखास निवडून येतील. असेच मोहरे आपल्या पहिल्या यादीत जाहीर केलेले आहेत. ही यादी जाहीर करताना भारतीय जनता पक्षाने ज्या ज्या ठिकाणी एकापेक्षा अधिक उमेदवारांचे अर्ज आहेत किंवा ज्या ज्या आमदारांची खूफिया रिपोर्ट कार्ड प्रतिकूल आहेत. त्या त्या ठिकाणचे उमेदवार अजून तरी जाहीर केलेले नाहीत. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला अनेक आश्चर्ये अनुभवायला लागली होती. त्यापूर्वीच्या लोकसभा निवडणुकीत ९० टक्के खासदार निवडून आले होते. ते प्रमाण मागील निवडणुकीत कमी झाल्याचे दिसले. पण आता भारतीय जनता पक्षाने तेव्हाची झालेली तत्कालिक मरगळ झटकून टाकलेली आहे. गेल्या दोन महिन्यात शिंदे सरकारने ज्या ज्या घोषणा केल्या आहेत. त्यापैकी अनेक योजना महिलांना झुकते माप देणाऱ्या आहेत. त्यात मध्य प्रदेशची लाडली बहना महाराष्ट्रात लाडकी बहीण झालेली आहे. अंगणवाडी सेविकांचे पगार वाढवले आहेत. यासारख्या अनेक महिलाप्रेमी योजना वाजत गाजत घोषित केल्याने त्याचा लाभ आपल्याला मिळेल. याची खात्री बाळगून भारतीय जनता पक्षाने योजनाबद्ध रीतीने आपली खात्रीचीच नावे जाहीर केलेली आहेत. या उमेदवारांमध्ये सध्याच्या सरकारमधील मंत्री चंद्रकांत दादा पाटील असोत, जामनेर मधून गिरीश महाजन असोत किंवा सुधीर मनगुंटीवार असोत या सर्वांना तिकिटे दिलेली आहेत. अजितदादांच्या महायुतीतील प्रवेशानंतर अनेक मंत्रीपदेच्छुकांना आपल्या शपथविधीसाठी शिवलेल्या सूटची घडीही मोडता आली नव्हती. त्यांनाही या यादीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. भारतीय जनता पक्षाचे सर्व काम योजनाबद्ध रीतीने चालते. थोडेफार इकडचे तिकडे होत असले. तरी उमेदवारांची उपयोगिता, त्यांची निवडून येण्याची क्षमता, जातीपातीचे गणित, आर्थिक जुळवाजुळव आणि पक्षश्रेष्ठींचा विश्वास ज्यांनी ज्यांनी कमावलेला आहे. त्यापैकी एकानेही तिकीट गमावलेले नाही. अजून एक महत्त्वाची बाब अशी आहे की, भारतीय जनता पक्षाला गेल्या निवडणुकीत जेवढ्या जागा लढायला मिळाल्या होत्या. जवळजवळ तेवढ्याच जागा आताही लढवायला मिळत आहेत. शिंदे साहेबांच्या खऱ्या शिवसेनेला आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला किती जागा द्यायच्या, हे ठरवून भाजप श्रेष्ठींनी त्यांना तेवढ्याच जागा दिलेल्या आहेत. आता भारतीय जनता पक्षाला उरलेल्या पाच डझन जागांवर डझनभर इच्छुक उमेदवारांपैकी एकाची निवड करायची आहे. या यादीत ज्या ज्या विद्यमान आमदारांना तिकीट मिळालेले नाही. त्यांनाही आता मोठी कसरत करावी लागू शकते. भारतीय जनता पक्ष निवडणुकीच्या गणितात प्राविण्य मिळवलेला पक्ष आहे. मतदार तेवढा मेळवावा आणि भारतीय जनता पक्ष वाढवावा, हे भाजपचे सूत्र आहे. त्या दृष्टीने पाहिल्यास उमेदवार जाहीर करताना घेतलेली आघाडी प्रत्यक्ष निकालातही दिसेल. अशीच दक्षता घेण्यात आलेली आहे. एका शिताच्या परीक्षेवरून सगळा भात शिजला की नाही, ते ठरवण्यात येते. त्याप्रमाणे हे ९९ उमेदवारांचे नामनिर्देशन भाजपला शंभरीपार नेईल, यासाठीच भाजपच्या पक्ष श्रेष्ठींची ही व्यूहरचना असावी, असे समजायला हरकत नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महाराष्ट्र निवडणुकीवर काँग्रेस केंद्रीय निवडणूक समितीची बैठक रद्द

**रात्री उशिरापर्यंत मुंबईत सुरू होती बैठक**

**बैठकीनंतर पहिली यादी येणार होती**



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, २० :** महाराष्ट्र काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची आज (२० ऑक्टोबर) होणारी बैठक रद्द करण्यात आली आहे. यामध्ये विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारांची यादी निश्चित केली जाणार होती. या बैठकीनंतरच काँग्रेसच्या उमेदवारांची पहिली यादी येणार होती. मात्र आता ही बैठक उद्या सायंकाळी पाच वाजता होणार आहे. त्यानंतरच काँग्रेसचे उमेदवार जाहीर केले जातील. एक दिवस आधी म्हणजे १९ ऑक्टोबरला मुंबईतील ट्रायडंट हॉटेलमध्ये सहा तास ही बैठक रात्री उशिरा संपली होती. यापूर्वी १६ ऑक्टोबर रोजी दिल्लीत महाराष्ट्र निवडणूक छाननी समितीची बैठक झाली होती. यानंतर, १७ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादीचे (एसपी) अध्यक्ष शरद पवार म्हणाले होते की महाविकास आघाडी (एमव्हीए) मध्ये २८८ पैकी २०० विधानसभा जागांवर एकमत झाले आहे. मात्र, एका प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले मी जागावाटपाच्या चर्चेत थेट सहभागी नाही. जयंत पाटील (पक्षाचे प्रदेशाध्यक्ष) पक्षाचे प्रतिनिधित्व करत आहेत. मध्ये काँग्रेस, आणि शिवसेना (युबीटी ) यांचा समावेश आहे.
निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर केली होती. राज्यातील सर्व २८८ जागांवर एकाच टप्प्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे.
यापूर्वी शुक्रवारी पक्षाने भिवंडी पूर्वमधून विद्यमान आमदार रईस शेख, भिवंडी पश्चिममधून रियाझ आझमी आणि मालेगाव मध्यमधून शान-ए-हिंद यांना उमेदवारी दिली होती.

**अखिलेश यांनी महाविकास आघाडी कडून १२ जागा मागितल्या**

समाजवादी पक्षाने (एसपी) महाराष्ट्रात महाविकास आघाडीकडे (एमव्हीए) १२ जागा मागितल्या आहेत. पक्षप्रमुख अखिलेश यादव यांनी १९ ऑक्टोबर रोजी धुळे विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली. यानंतर मीडियाशी बोलताना ते म्हणाले आम्ही कडून १२ जागा मागितल्या आहेत. जागांचा तपशीलही त्यांना पाठवण्यात आला आहे.

सपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आणि आमदार अबू असीम आझमी म्हणाले -आम्ही पाच उमेदवार जाहीर केले आहेत जेणेकरून एमव्हीएला कळेल की आम्ही येथे मजबूत आहोत, अन्यथा ते बैठकीत सांगतील की तुमचा उमेदवार मजबूत नाही.
महाराष्ट्र भाजपने ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने रविवारी ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यापैकी ६ जागा एसटीसाठी आणि ४ जागा एससीसाठी आहेत. तर १३ जागांवर महिलांना तिकीट देण्यात आले आहे. ११ पहिल्यांदाच निवडणूक लढवणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दक्षिण-पश्चिमनागपूरमधून, तर महाराष्ट्र भाजपचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना कामठी मतदारसंघातून तिकीट देण्यात आले आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांना भोकरमधून तर माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचे पुत्र संतोष दानवे यांना भोकरदनमधून तिकीट मिळाले आहे.

# भाजपची ९९ उमेदवारांची पहिली यादी



- ८९ जणांना पुन्हा संधी
- १० एस.सी., एस.टी.
- १३ महिला
- ३ अपक्षांना तिकिट;
- फडणवीस नागपूर दक्षिण-पश्चिममधून लढणार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, २० :**
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने रविवारी ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यापैकी ६ जागा एसटीसाठी आणि ४ जागा एससीसाठी आहेत. तर १३ जागांवर महिलांना तिकीट देण्यात आले आहे. १० उमेदवार पहिल्यांदाच निवडणूक लढवणार आहेत.
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर दक्षिण-पश्चिममधून, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना कामठी मतदारसंघातून तिकीट देण्यात आले आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांना भोकरमधून तर माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचे पुत्र संतोष दानवे यांना भोकरदनमधून तिकीट मिळाले आहे.

**३ अपक्षांनाही तिकीट**
भाजपच्या पहिल्या यादीत महेश बालदी (उरण), राजेश बकाणे (देवळी), विनोद अग्रवाल (गोंदिया) या तीन अपक्षांचा समावेश आहे.

**लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या दोघांना तिकीट**
मे महिन्यात लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेले सुधीर मुनगंटीवार यांना बल्लारपूरमधून तर मिहीर कोटेचा यांना मुलुंडमधून तिकीट देण्यात आले आहे.

**२ भावांना तिकीट मिळाले**
मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांना वांद्रे पश्चिम आणि त्यांचे बंधू विनोद शेलार यांना मालाड पश्चिममधून उमेदवारी दिली आहे.

**विधानसभा अध्यक्ष नार्वेकर कुलाब्यातून लढणार**
विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर कुलाब्यातून तर नितीश राणे कणकवलीतून निवडणूक लढवणार आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या आमदारांचे सदस्यत्व रद्द न केल्याने नार्वेकर विरोधकांच्या निशाण्यावर आहेत. तर नितेश राणे मुस्लीमविरोधी वक्तव्यामुळे वादात सापडले आहेत.
महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा जागांसाठी २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहे. नांदेड लोकसभा जागेवरही २० नोव्हेंबरला पोटनिवडणूक होणार आहे. त्या जागेसाठी भाजपने अद्याप उमेदवार

## ५० हजार खर्चून निवडणुकीतील मतदान आपल्याकडे वळवा

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, २० :**
प्रकाश आंबेडकरांनी एक्सवर एक व्हिडीओ जारी केला आहे.
सर्वोच्च न्यायालयाने दोन महिन्यांपूर्वी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या आरक्षणात काही जातींना वेगळे आरक्षण देण्यासाठी वर्गीकरण करता येईल, असा निकाल दिला. या निकालाच्या विरोधात देशभरातल्या अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या संघटनांनी एकत्र येत २१ ऑगस्ट रोजी भारत बंदचे आंदोलन पुकारले होते. अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणाला संविधानाच्या नवव्या परिशिष्टात टाकावे, जेणेकरून भविष्यात पुन्हा कधीही त्याला न्यायालयात आव्हान देता येणार नाही, अशी मागणीही त्या भारत बंद आंदोलनाद्वारे करण्यात आली होती.



**वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांचा केंद्र सरकारच्या धोरणास विरोध**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण आणि क्रिमी लेअरचा निर्णय लागू करण्याच्या दृष्टीने पावलं टाकण्यास सुरुवात केली आहे.

## निवडणूक कामात कसूर पडली महागात

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर , २० :**
निवडणूक कामात कसूर केल्याबद्दल मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहाय्यक शिक्षक जयप्रकाश हेडाऊ यांच्यावर कारवाई करण्यात आली असून त्यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
विधानसभा निवडणुकीत प्राथमिक टप्प्यात ८५ पेक्षा अधिक वय आहे अशा ज्येष्ठ नागरिकांना व दिव्यांग मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. ही जबाबदारी सोपविण्यात आलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहाय्यक शिक्षक जयप्रकाश हेडाऊ यांनी अधिकृत कर्तव्याचे पालन न केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध लेखी तक्रार दाखल झाली. या तक्रारी अन्वये सावनेर येथील पोलिस स्टेशनमध्ये लोकप्रतिनिधीत्व अधिनियमान्वये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावनेरचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रविंद्र होळी यांनी सावनेर पोलिस ठाण्यात सदर

## न्यूझीलंडकडून ३६ वर्षांनंतर कसोटीत भारताचा पराभव



**३ सामन्यांच्या मालिकेत संघ १-0ने पिछाडीवर**
या पराभवानंतर भारतीय संघ ३ सामन्यांच्या मालिकेत ०-१ ने पिछाडीवर पडला आहे. मालिकेतील दुसरा सामना २४ ते २८ ऑक्टोबर दरम्यान पुण्यात होणार आहे.

- पहिल्या डावात फलंदाज फ्लॉप
- मालिकेत ०-१ने पिछाडीवर

■ **महासागर प्रतिनिधी**
**बेंगळुरू , २० :**
बंगळुरू कसोटीत न्यूझीलंडविरुद्ध भारतीय संघाला ८ विकेट्सनी पराभव स्वीकारावा लागला. ३६ वर्षांनंतर घरच्या मैदानावर किवीजविरुद्ध संघाचा पराभव झाला आहे. शेवटचा पराभव १९८८ मध्ये वानखेडे स्टेडियमवर झाला होता. भारतीय संघाने किवींना विजयासाठी १०७ धावांचे लक्ष्य दिले होते, जे पाहुण्या संघाने रविवारी २ गडी गमावून पूर्ण केले. विल यंग ४५ आणि रचिन रवींद्रने ३९ धावा करून नाबाद परतला. तत्पूर्वी टीम इंडिया दुसऱ्या इनिंगमध्ये ४६२ रन्सवर ऑलआऊट झाली होती. न्यूझीलंडने पहिल्या डावात ४०२ धावा केल्या तर भारताने ४६ धावा केल्या.

# गौरी लंकेश मर्डर केसमधील आरोपीच्या पक्षप्रवेशावर सुळेंची शिंदेंवर टीका

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, २० :**
पत्रकार गौरी लंकेश यांच्या हत्या प्रकरणातील आरोप श्रीकांत पांगारकर याने शनिवारी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. विशेष म्हणजे पक्षप्रवेशानंतर पांगारकर यांची जालना विधानसभा प्रमुखपदी नियुक्ती देखील केली. श्रीकांत पांगारकरांच्या पक्षप्रवेशावरुन विरोधकांकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेनेला टार्गेट केले जात आहे. या राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचे तीन तेरा का वाजले, याच्या काही कारणांपैकी हे एक प्रमुख कारण आहे, अशा शब्दांत खासदार सुप्रिया सुळे यांनीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. सुप्रिया सुळे यांनी आपल्या सोशल मीडियावरुन मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केले आहे. या राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचे तीन तेरा का वाजले, याच्या काही कारणांपैकी हे एक प्रमुख कारण आहे, असा टोलाही त्यांनी लगावला. या सरकारला न्यायाच्या राज्याबाबत शून्य आदर आहे. म्हणूनच महाराष्ट्राला खोके सरकारला नाकारणारे आणि कायद्याचा आब आणि आदर करणारे शासन हवे आहे,

**काय म्हणाल्या सुप्रिया सुळे?**
हे अतिशय धक्कादायक आहे. गुन्हेगारांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्यात खुद्द मावळते मुख्यमंत्री आणि त्यांचा पक्ष आघाडीवर आहे. या राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचे तीन तेरा का वाजले, याच्या काही कारणांपैकी हे एक प्रमुख कारण असल्याचे सुळे यांनी म्हटले. प्रख्यात पत्रकार गौरी लंकेश यांच्या मारेकऱ्याला खोके सरकारच्या घटक पक्षाने पावन करुन घेतले.



## कुख्यात गुन्हेगार शेख अफसर उर्फ अंडा याला अटक

**नागपूर गुन्हे शाखेची कारवाई**



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर , २० :**
गुन्हे शाखा यूनिट क्रमांक २ ने जिल्ह्यातील एका दर्ग्यात लपून बसलेला कुख्यात गुन्हेगार शेख अफसर उर्फ अंडा शेख युसुफ याला शिताफिने ताब्यात घेवून वाठोडा पोलिसांच्या स्वाधिन केले. पोलिस ठाण्यात दाखल दरोड्याच्या गुन्ह्यात तो फरार होता. त्याच्या विरूद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१० (२), ३५१ (२), ३५३ अन्वये गुन्हे दाखल आहे. या प्र रणात आरिफ इरफान पठाण (वय २८) याने तक्रार दिली होती. पोलिस ठाणे वाठोडा नागपूर शहर येथे दाखल उपरोक्त गुन्ह्यातील रेकॉर्ड वरील आरोपी शेख अफसर उर्फ अंडा शेख युसुफ याचा शोध पोलिस घेत होते. त्याचा शोध गुन्हे शाखा यूनिट २ घेत असताना आरोपी कन्हान नदीच्या पुलाजवळ, कामठी रोड येथील जंगलात असलेल्या दर्गामध्ये असल्याची गोपनीय माहिती मिळाली.
मिळालेल्या माहिती नुसार गुन्हे शाखा यूनिटच्या अधिकारी व अंमलदार यांनी तिथे जावून त्याला ताब्यात घेतले. व वाठोडा पोलिसांच्या ताब्यात दिले. यापूर्वी गिट्टीखदान पोलिसांनी अफसर अंडा उर्फ शेख अफसर शेख युसूफ याच्या घरावर छापा टाकून सहा काडतुसे जप्त केली होती. तो गांजा व इतर अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी प्रसिद्ध गुन्हेगार आहे. त्याच्यावर अंमली पदार्थ विक्रीचे डझनभर गुन्हे दाखल आहेत. पूर्वी तो गांजा विकायचा.

# मनोज जरांगेंचा विधानसभेसाठी एल्गार

■ **महासागर प्रतिनिधी**
**जालना , २० :**
जालना येथील आंतरवाली सराटीत गेल्या काही दिवसांपासून मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आंदोलन करत असलेले मनोज जरांगे पाटील यांनी आगामी निवडणूक संदर्भात त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. आजच्या बैठकीत जरांगे पाटील म्हणाले- जिथे उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे तिथेच आपले उमेदवार उभे करा. याचबरोबर एससी आणि एसटीच्या जागा असलेल्या ठिकणी आपला उमेदवार द्यायचा नाही.



ते पुढे म्हणाले- जे कोणी निवडणुकीसाठी इच्छुक आहेत, त्या सर्वांनी अर्ज भरावेत. अर्ज भरण्याच्या शेवटीच्या दिवसापर्यंत मी मतदारसंघांचा अंदाज घेऊन कोणाचा अर्ज ठेवायचा आणि कोणाचा मागे घ्यायचा याचा निर्णय देईल.

**उमेदवार द्यायचे की पाडायचे? काय म्हणाले जरांगे**
जिथे निवडून येथील तिथे अपक्ष उमेदवार उभा करावा, असे जरांगे म्हणाले. ज्या ठिकाणी निवडून येणार नाहीत, तिथे जो आपल्याला आपल्या मागण्या पूर्ण करण्याबाबत बाँडवर लिहून देतील त्याला निवडून द्यायचे अन्यथा सर्व पाडायचे, असे जरांगे म्हणाले. एससी आणि एसटीच्या जागांवर उमेदवार द्यायचे नाहीत.

**निवडणुकीत उमेदवार उतरवणार, एससी-एसटीच्या जागांवर उभे न राहण्याच्या सूचना**
महायुती आणि महाविकास आघाडी सख्खे मावसभाऊ, जरांगेंची टीका
महाविकास आघाडी आणि महायुती हे दोघेही सख्खे मावसभाऊ आहेत, अशी टीका मनोज जरांगे यांनी केली. आपण उमेदवार उभे करायचे म्हटले तर महायुतीला आनंद होतो आणि पाडायचे म्हटले तर महाविकास आघाडीला आनंद होतो. यांच्या याद्या दिल्लीत पडून आहेत. पण त्यांचे आपल्याकडे लक्ष आहे, असे जरांगे म्हणाले. दरम्यान, मनोज जरांगे यांनी बैठकीमध्ये उमेदवार उभे करायचे की पाडायचे याबाबत समाज बांधवांचे मत जाणून घेतले.

# रेल्वे प्रवाशांना बिस्किटमधून गुंगीचे औषध देऊन, चोऱ्या करणाऱ्याला कल्याण रेल्वे स्थानकात अटक

कल्याण, दि. २० : प्रतिनिधी



रेल्वे प्रवाशाशी सलगी करून त्याला बोलण्यात गुंतवून प्रवाशाला बिस्किटमधून गुंगीचे औषध खाण्यास द्यायचे. प्रवासी गुंगी येऊन पडला की त्याच्या जवळील किमती ऐवज किंवा त्याच्या पिशवीतील रोख रक्कम, मोबाईल घेऊन पळून जाणाऱ्या एका सराईत चोरट्याला कल्याण लोहमार्ग पोलिसांनी बुधवारी अटक केली आहे. रामसुरत रामराज पाल (४६) असे आरोपीचे नाव आहे. तो मुळचा उत्तरप्रदेशातील आहे. तो सध्या भिवंडी येथे वास्तव्यास आहे. भिवंडीत राहून तो कल्याण ते मुंबई परिसरातील रेल्वे स्थानकांवर प्रवाशांच्या पिशव्या, मोबाईल चोरण्याचे धंदे करत होता.

कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरी कांदे यांनी सांगितले, मंगळवारी दुपारी एक प्रवासी कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर उभा होता. त्याला उत्तरप्रदेशात जायचे होते. त्याच्या जवळ एक ते दोन पिशव्या होत्या. तो प्रवासी उत्तरप्रदेशात जाणाऱ्या एक्सप्रेसची वाट पाहत उभा होता. आरोपी रामसुरत याने त्या प्रवाशाजवळ जाऊन तू कोठे चालला आहेस, अशी विचारणा केली. त्याने आपण उत्तरप्रदेशात चाललो आहोत, असे सांगितले. रामसुरतनेही मीही उत्तरप्रदेशातील असून तेथेच जाणार आहे, असे स्पष्ट केले. रामसुरतने त्या प्रवाशाशी सलगी वाढून त्याच्याशी बोलणे सुरू केले. या बोलण्यात आपणास भूक लागली आहे असे बोलून आरोपी रामसुरत याने स्वताजवळील बार बोर्न बिस्किट काढून खाण्यास सुरुवात केली.

प्रवाशाची नजर चुकवून रामसुरतने प्रवाशाला द्यायच्या बिस्किटला गुंगीचे औषध लावून ते प्रवाशाला खाण्यास दिले. आपला सोबती आपणास बिस्किट देत आहे म्हणून प्रवाशाने ते खाल्ले. तेवढ्यात प्रवाशाला तात्काळ गुंगी येऊन त्याचे डोके जड झाले. त्याला उलटी, मळमळ सुरू झाली. प्रवासी बसल्या जागीच चक्कर येऊन कोसळला. या संधीचा गैरफायदा घेत रामसुरतने प्रवाशाची पिशवी उचलून तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला.

गस्तीवरील रेल्वे पोलिसांच्या हा प्रकार निदर्शनास आला. त्यांनी तातडीने रामसुरतला रोखून पिशवी कोणाची आहे अशी विचारणा केली. रामसुरतची बोबडी वळली. पोलिसांना हा प्रकार संशयास्पद वाटल्याने तातडीने रामसुरतला लोहमार्ग पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्याची कसून चौकशी करताच त्याने आपण एका प्रवाशाला बिस्किटातून गुंगीचे औषध देऊन त्याची पिशवी चोरल्याची कबुली पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने स्कायवॉकवरील गुंगी येऊन पडलेल्या प्रवाशाला लोहमार्ग पोलीस ठाण्यात आणले. त्याला रुग्णालयात उपचारासाठी नेले. पोलिसांनी रामसुरतवर गुन्हा दाखल करून त्याची चौकशी सुरू केली आहे. रामसुरतने गुंगीचे औषध कोठुन आणले. त्याने आतापर्यंत अशाप्रकारे किती चोऱ्या केल्या आहेत याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. कुर्ला रेल्वे स्थानकात येथेही रामसुरतवर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. रामसुरत हा सराईत अभिलेखावरील गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

# भिवंडीत दीड लाखांची वीज चोरी उघड

भिवंडी, दि. १८ : प्रतिनिधी

भिवंडीत वीज वितरण व विज बिल वसुली करणाऱ्या टोरेंट पॉवर कंपनीच्या भरारी पथकाने केलेल्या कारवाई दीड लाख रुपयांची वीज चोरी उघडकीस आणली आहे.तालुक्यातील वेहेळे गाव ग्रामपंचायत कार्यालय शेजारी राहणारे विजग्राहक जोशी संजीवनी दिनेश व विज वापरणारे दिनेश जोशी यांनी आपल्या आर्थिक फायद्यासाठी विजमिटरच्या इनकमिंग टर्मिनल मध्ये केबल जोडून वीज मीटर बायपास करून ६९५६ युनिट विजभार वापर करून १ लाख ५३ हजार ३८१ रुपयांची वीज चोरी केल्याचे उघडकीस आणले आहे.याप्रकरणी शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# विद्यमान आमदारांना 'हरियाणा पॅटर्न'चा धसका

## उमेदवार बदलणार, की राहणार, याबाबत भाजपचे 'नवे' निकष

पुणे, दि. २० : प्रतिनिधी

हरियाणातील विजयामुळे भारतीय जनता पक्षाचा आत्मविश्वास दुणावला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीतही 'हरियाणा पॅटर्न' वापरण्याच्या हालाचाली भाजपकडून सुरू झाल्या असून, जातीय समीकरणांचा प्रभावी वापर केला जाणार असल्याचे समजते. तसेच सलग तीन वेळा आमदार झालेल्यांच्या कामगिरीचे मूल्यमापनही केले जाणार असल्याने अशा आमदारांची धाकधूक आता वाढली आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीतही भाजपला फटका बसेल, अशी चर्चा सुरू झाली होती. मात्र, काही दिवसांपूर्वी आलेल्या हरियाणातील निकालांमुळे भाजपचा आत्मविश्वास वाढला आहे. या निवडणुकीत सामाजिक आणि जातीय समीकरणे जुळविण्यात आली होती. ही बाब लक्षात घेऊन राज्यातही चमत्कार घडविण्याची तयारी भाजपकडून करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, आमदारांच्या कामगिरीचे मूल्यमापन होणार आहे. मूल्यमापनानंतरच निवडणुकीत पुन्हा संधी देण्याचा किंवा न देण्याचा निर्णय होणार असल्याने तीन वेळा आमदार झालेल्या आणि पुन्हा उमेदवारीच्या प्रतीक्षेत असलेल्यांची धाकधूक वाढली आहे.



शहराचा विचार करता, पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ आणि खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर हे दोघे तीन वेळा आमदार झाले असून, चौथ्यांदा उमेदवारीसाठी इच्छुक आहेत. पण, हरियाणा पॅटर्नच्या निकषामुळे पर्वती आणि खडकवासला मतदारसंघातील येथील इच्छुकांनी जोर पकडला आहे. हरियाणा पॅटर्ननुसार, निवडणूक जिंकण्याची शक्यता ५० टक्क्यांपेक्षा कमी असलेल्या आमदारांची उमेदवारी ठरविण्याचे काम पक्षाची यंत्रणा करणार आहे. त्यासाठी बूथनिहाय नियोजन केले जाणार आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी विधानसभा निवडणुकीत विद्यमान आमदारांना तिकिटे नाकारण्याचे धोरण भाजपने स्वीकारल्याची चर्चा आहे. त्यामुळे अनेक विद्यमान आमदारांऐवजी नव्या उमेदवारांना संधी दिली जाणार आहे. पर्वती विधानसभा मतदारसंघाचे माधुरी मिसाळ सलग १५ वर्षे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यांना स्वपक्षातून आव्हान निर्माण झाले असून, माजी सभागृहनेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू श्रीनाथ भिमाले यांनी मिसाळ यांच्याविरोधात दंड थोपटले आहेत. भिमाले यांनी 'लढणार आणि जिंकणार' असा विश्वास व्यक्त केला आहे. तर, आमदार मिसाळ यांनी काही दिवसांपूर्वी मतदारसंघातील विविध विकासकामांची माहिती जाहीर करून पर्वतीमधूनच चौथ्यांदा उमेदवारी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला होता.

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीरही सलग तीन वेळा निवडून आले आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत तापकीर यांचा अवघ्या काही मतांनी निसटता विजय झाला होता. तापकीर यांना पुन्हा उमेदवारी देऊ नये, अशी मागणी सातत्याने पुढे येत आहे. भाजपच्या बैठकीतही त्यावरून खडाजंगी झाली होती. तसेच या मतदारसंघावर शिवसेनेने (शिंदे) दावा केला आहे. मात्र, हा मतदारसंघ भाजपकडे राहील, असा अंदाज आहे. त्यामुळे आमदारांच्या गेल्या १५ वर्षांतील कामगिरीचे मूल्यमापन पक्षाकडून सुरू करण्यात आले आहे. त्याचा अहवाल वरिष्ठांना दिला जाईल. त्यानंतरच त्यांच्या उमेदवारीबाबतचा निर्णय होईल, अशी माहिती भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

# जेष्ठ नागरिकांना फसवणाऱ्या सराईत आंतरराज्यीय टोळीला अटक

नालासोपारा, दि. २० : प्रतिनिधी

जेष्ठ नागरिकांना बोलण्यात गुंतवून, हातचालाखीने फसवणुक करुन, सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या चार आरोपींच्या सराईत आंतरराज्यीय टोळीला गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांना यश मिळाले आहे. या टोळीकडून पोलिसांनी दोन गुन्ह्यांची उकल करून लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी व सपोनि श्रीराम करांडे यांनी गुरुवारी दिली आहे.

टाकी रोडवरील आंबेडकर नगर येथे राहणाऱ्या जेसी रॉड्रीक्स (५९) यांची १२ ऑक्टोबरला संध्याकाळी बतावणी करून फसवणूक केली होती. त्या घटनेच्या दिवशी चेतन बार ते केएमपीडी कॉलेजच्या रोडवर असताना त्यांना रस्त्यात दोन आरोपी भेटले होते. आरोपींनी त्यांना त्यांच्याजवळील ५ लाख रुपयांचे कागदी खोटे बंडल देऊन त्यांच्या गळ्यातील १ लाख रुपये किंमतीची दीड तोळे वजनाची सोन्याची चेन खोटी बतावणी करून फसवणूक केली होती. याप्रकरणी तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. पोलीस आयुक्तालयात गेल्या काही दिवसांपासून जेष्ठ नागरीकांना बोलण्यात गुंतवून अशाच प्रकारे बतावणीचे गुन्ह्यात वाढ झाल्याने सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवून गुन्हे विभागाचे पोलीस उपायुक्त व सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी दिलेल्या सुचना च आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट तीनने सुरु केला. दरम्यान घटनास्थळावरील उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करून तसेच बातमीवरुन आरोपी शंकर राय (३७), मंगल सिलावट (३७), सचिन राठोड (२२) आणि राजुराव राय (२५) यांना ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक तपास केल्यावर दोन गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाला आहे. आरोपीकडून दोन्ही गुन्ह्यांतील फसवणूक झालेले सुमारे ३ लाख रुपये किंमतीचे साडे चार तोळे वजनाचे सर्व सोन्याचे दागिने व इतर मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपी सध्या विरार पोलीस ठाण्याचे पोलीस कोठडीमध्ये आहेत. सदरची कामगिरी पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, सपोनि सोपान पाटील, पोउपनिरी उमेश भागवत, सफौ. अशोक पाटील, पोहवा मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, मनोज तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, मसुब प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे तसेच सायबर सेलचे संतोष चव्हाण यांनी पार पाडली आहे.

# मतदान आळसाची पुणेकरांची सवय जुनीच!

पुणे, दि. २० : प्रतिनिधी

पुण्यात झालेल्या कोणत्याही गोष्टीची देशभर चर्चा होत असते. चर्चा झाली, तरी 'हे फक्त पुण्यातच घडते'असे पुणेकर अभिमानाने छाती फुगवून सांगत असतात. मात्र, मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी भर पत्रकार परिषदेत राज्यात सर्वाधिक कमी मतदान हे पुणे आणि ठाण्यात होत असल्याची वास्तुस्थिती मांडली आणि मतदान करण्यात पुणेकर निरुत्साही असल्याचे उघड झाले. मात्र, ही काही फक्त गेल्या विधानसभा निवडणुकीतील स्थिती नसून, आजवर प्रत्येक निवडणुकीत पुण्यात जेमतेम ५० टक्के मतदान झाले आहे. १८८३ पासून पुण्यात तत्कालीन नगर परिषदेपासून आजवरच्या मतदानाच्या टक्केवारीवर नजर टाकल्यास एखादी निवडणूक वगळता बहुतांश निवडणुकीत निम्मेच पुणेकर मतदान करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे मतदानाला पुणेकर आळस का करतात, हा विषय चव्हाट्यावर आला आहे.



पुण्यात झालेल्या निवडणुका आणि त्या वेळी झालेल्या मतदानाची टक्केवारी पाहिल्यास मतदानाला आळस करणे, ही पुणेकरांची जुनी खोड असल्याचे दिसते. १८८३ पासून १९५२ पर्यंत झालेल्या तत्कालीन नगरपालिका निवडणुकांमध्ये काही अपवाद वगळता बहुतांश निवडणुकांमध्ये सरासरी ५० ते ५५ टक्के मतदान झाल्याचे दिसून येते. १८५० ते १८७२ या कालावधीत तत्कालीन नगरपालिकेचा कारभार हा सरकारनियुक्त सभासदांच्या ताब्यात होता. नगरपालिकेची पहिली निवडणूक ही २८ मार्च १८८३ रोजी झाली. त्या वेळी २४ पैकी १२ सभासद हे निर्वाचित होते. उर्वरित सरकारनियुक्त होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये तुलनेने जास्त मतदान होत असते. वॉर्ड किंवा प्रभागाचे क्षेत्र मर्यादित असणे आणि उमेदवारांचा मतदारांशी असलेला रोजचा संपर्क यामुळे जास्तीत जास्त मतदार मतदानासाठी घराबाहेर पडत असल्याचा अंदाज काढला जातो. मात्र, आतापर्यंत झालेल्या निवडणुकीतील मतटक्का पाहिल्यास पुण्यात हा अंदाज फोल ठरलेला दिसतो. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्येही पुणेकरांनी मतदानासाठी काही अपवादवगळता उत्साह दाखविलेला नाही.

पुणे नगरपालिकेची १९२२, १९२५ आणि १९३८ या वर्षी निवडणूक झाली होती. १९२२ मध्ये ६५ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. त्यानंतर १९२५ मध्ये ६७ टक्के, तर १९३८ मध्ये ६६ टक्के मतदारांनी मतदान केले होते. या तिन्ही निवडणुकांमध्ये मतदान वाढण्यास तत्कालीन परिस्थिती कारणीभूत होती. १९२२ आणि १९२५ मध्ये कॉँग्रेस, हिंदू सभा आणि ब्राह्मणेतर पक्ष यांच्यामध्ये चुरशीची स्थिती होती. त्याचा परिणाम मतदानावर झालेला दिसतो. १९३८ हे वर्ष मतदानाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. त्या वेळी कॉँग्रेस पक्ष हा अधिकृतरीत्या निवडणुकीत उतरला होता. त्यामुळे कॉँग्रेसने त्या निवडणुकीत जोमाने प्रचारावर भर दिला. त्यामुळे मतदानाचे प्रमाण वाढले होते.

पुणे महापालिकेची १९५० मध्ये स्थापना झाली. त्यानंतर १९५२ मध्ये झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीतही ५० टक्केच मतदारांनी मतदान केले. त्या वेळी पुण्यात दोन लाख सहा हजार मतदार होते. त्यानंतर झालेल्या निवडणुकांमध्ये मतदारांच्या संख्येत वाढ झाली, तरी मतदानाचा टक्का वाढलेला दिसत नाही.

पुण्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्येही मतदानाबाबत पुणेकरांचा कल हा मतदान न करण्याकडे असल्याचे पाहायला मिळतो. लोकसभेच्या १९५१ ते आजपर्यंत झालेल्या १८ निवडणुकांमध्ये सरासरी ४५ ते ५० टक्के, तर विधानसभेला एखादी निवडणूक अपवादवगळता ५० ते ५५ टक्के मतदारांकडून मतदान झाले आहे. मतदानात आळस करण्याची पुणेकरांची जुनी सवय सर्वच निवडणुकांमध्ये मतदानाचा टक्का खालाविण्यास कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत तरी मतदानाचा टक्का वाढावा, अशी प्रशासनाकडून अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# बदलापूरात मनसेच्या संगिता चेंदवणकर विधानसभेच्या निवडणूकीच्या रिंगणात!

बदलापूर, दि. २० : प्रतिनिधी

बदलापूर शहरातील चिमुकल्यांच्या अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल होण्यात आणि झालेल्या उत्स्फुर्त आंदोलनात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या मनसेच्या संगिता चेंदवणकरही विधानसभेच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला आघाडीच्या प्रमुख असलेल्या संगिता चेंदवणकर यांचे राज ठाकरे यांनी जाहीर कौतुक केले होते. त्यानंतर आता त्यांनाच उमेदवारी देण्याची चर्चा मनसेत रंगली आहे. लवकरच त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता आहे.

मुरबाड विधानसभा मतदारसंघात सर्वात मोठी लोकसंख्या बदलापूर शहराची आहे. बदलापूर शहरातील मते निर्णायक ठरतात. गेल्या १५ वर्षे आमदार किसन कथोरे येथून प्रतिनिधीत्व करतात. २००९ च्या निवडणुकीत कथोरे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातून आमदार झाले होते. त्यानंतर त्यांनी २०१४ मध्ये भाजपात प्रवेश घेत २०१४ आणि २०१९ ची निवडणूक जिंकली. या निवडणुकांमध्ये त्यांना गोटीराम पवार, वामन म्हात्रे यांनी आव्हान दिले. सध्या वामन म्हात्रे आणि किसन कथोरे महायुतीत असून गोटीराम पवार राजकारणातून दूर झाले आहेत. मात्र त्यांचे पुत्र सुभाष पवार यंदा इच्छुक आहेत. महायुतीत कपिल पाटील विरूद्ध किसन कथोरे भाजपांतर्गत तर वामन म्हात्रे आणि सुभाष पवार विरूद्ध किसन कथोरे असा शिवसेना – भाजप वाद सुरू आहेत. त्यातच आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मुरबाड विधानसभा मतदारसंघात उमेदवार देण्याचे निश्चित केल्याची खात्रीलायक माहिती मनसेतील सुत्रांनी दिली आहे. बदलापूर शहरात दोन महिन्यांपूर्वी एका नामांकीत शाळेत दोन चिमुकल्यांवर अत्याचाराची घटना घडली होती. यात पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली. मात्र मनसेच्या बदलापूर महिला आघाडीच्या प्रमुख संगिता चेंदवणकर यांनी यात पुढाकार घेतल्याने उशिरा का हाईना गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर शहरात नागरिकांनी उत्स्फुर्त आंदोलन केले. याचेही नेतृत्व संगिता चेंदवणकर यांनी केले. याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हाही दाखल झाला. या घटनेला वाचा फोडल्याबद्दल राज ठाकरे यांनी चेंदवणकर यांचे जाहीर कौतुक केले.

आंदोलनानंतर ठाकरे यांनी काही दिवसात बदलापुरात येऊन पालकांशी संवाद साधत चेंदवणकर यांची पाठ थोपटली होती. रविवारी झालेल्या मनसेच्या मेळाव्यातही राज ठाकरे यांनी चेंदवणकर यांचा विशेष सत्कार करत त्यांचा गौरव केला. बदलापुरातील प्रकरणाला मनसेमुळे न्याय मिळाला याचा राज ठाकरे यांनी वारंवार उल्लेख केला. त्यामुळे संगिता चेंदवणकर यांच्यावर मनसेत मोठी जबाबदारी दिली जाईल अशी शक्यता होती. त्यातच आता मुरबाड विधानसभा मतदारसंघातून संगिता चेंदवणकर यांना उमेदवार दिली जाणार असल्याची चर्चा आहे. मनसेतील खात्रीलायक सुत्रांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. राज ठाकरे यांनी राज्यात सर्वाधिक जागा लढण्याचे यापूर्वीच घोषीत केले आहे. त्यामुळे मुरबाड विधानसभा मतदारसंघात आता चेंदवणकर यांच्या माध्यमातून महिला चेहरा देत विद्यमान आमदार किसन कथोरे यांना आव्हान देण्याच्या तयारी असल्याची माहिती आहे. लवकरच याची घोषणा होणार असल्याचीही माहिती मिळते आहे.

### प्रभावी महिला उमेदवार

शहरातील मराठी फेरिवाले यांच्या हक्कासाठी, उत्तर भारतीय विक्रेत्यांविरूद्ध, शहरातील विविध समस्यांवर आंदोलन करत संगिता चेंदवणकर प्रसिद्धीच्या झोतात असतात. त्यांच्या रूपाने प्रभावी महिला उमेदवार मुरबाडमध्ये मिळू शकतो. यापूर्वी बहुजन समाज पक्षातर्फे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शोभा इंगळे तर २००९ मध्ये रत्ना गायकवाड यांना उमेदवारी दिली होती. २०१४ मध्ये एकही महिला उमेदवार रिंगणात नव्हती.

### मनसेची मते विखुरलेली

बदलापूर अत्याचार प्रकरणानंतर शहरात मनसेबद्दल सहानभूती निर्माण झाली आहे. मात्र शहरात मनसेची ताकद पूर्वीपेक्षा कमी आहे. नऊ वर्षांपूर्वी झालेल्या पालिका निवडणुकीत एकही मनसेचा उमेदवार निवडून आला नव्हता. तर २००९ च्या निवडणुकीत वामन म्हात्रे यांनी मनसेतून निवडणुक लढवत ३७ हजार मते घेतली होती. त्यामुळे मनसेला संघटनात्मक बांधणीवर लक्ष द्यावे लागणार आहे.

# स्व.राजाराम डाकवे (तात्या) वाचनालयाकडून वृत्तपत्र विक्रेत्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान



तळमावले, दि.२० : प्रतिनिधी


माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन हा वृत्तपत्र विक्रेता दिवस म्हणून साजरा केला जातो. याचेच औचित्य साधत पाटण तालुक्यातील डाकेवाडी (काळगांव) येथील स्व.राजाराम डाकवे (तात्या) वाचनालयाच्यावतीने डॉ.संदीप डाकवे यांनी वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मानपत्र, शाल आणि तात्या पुस्तक देवून कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल विक्रेते बांधवांनी आभार व्यक्त केले. वृत्तपत्र वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विक्रेते ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता वर्षभर कार्यरत असतात. सकाळी वेळेत वृत्तपत्र हाती पडल्याने वाचकांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहून विक्रेत्याला त्याचा मोठा आनंद होतो. सकाळी वाचकांना वेळेत वृत्तपत्र मिळावे यासाठी विक्रेता बांधव मोठे कष्ट करत असतात. तिन्ही ऋतुंमध्ये त्यांचे हे कार्य सुरूच असते. समाजात दुर्लक्षित राहिलेल्या पण वाचनसंस्कृतीसाठी महत्त्वाचे काम करणाऱ्या या घटकाला कृतज्ञतापूर्वक सन्मान मिळाल्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होता. या कार्यक्रमाचे आयोजन स्व.राजाराम डाकवे (तात्या) वाचनालयाच्यावतीने करण्यात आले होते.

# मित्राच्या पत्नीवर तिघांकडून लैंगिक अत्याचार

पिंपरी, दि. २० : प्रतिनिधी

तीन जणांना वेगवेगळ्या दिवशी पत्नीवर लैंगिक अत्याचार करण्यास सांगून पतीने त्याचे चित्रीकरण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पतीसह चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना पुनावळे येथे घडली. पीडिता आणि सर्व आरोपी हे उच्चशिक्षित असून, एका बहुराष्ट्रीय कंपनीत कार्यरत आहेत.

याप्रकरणी ३० वर्षीय पत्नीने ठाणे शहरातील एका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मात्र, हा प्रकार रावेत भागात घडल्याने हे प्रकरण तपासासाठी बुधवारी (१६ ऑक्टोबर) रावेत पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले आहे. अभियंता असणाऱ्या पत्नीने फिर्याद दिल्यानंतर तिच्या पतीसह चार जणांविरोधात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल



करण्यात आला आहे. ही घटना सप्टेंबर २०२३ ते ६ एप्रिल २०२४ या कालावधीत पुनावळे येथे घडली आहे.

आरोपी असलेल्या पतीने तीन जणांना वेगवेगळ्या दिवशी आपल्या पत्नीवर लैंगिक अत्याचार करण्यास सांगितले. तसेच या अत्याचाराची अश्लील चित्रफित तयार केली. ती चित्रफित प्रसारित करण्याची धमकी दिली. तसेच पतीने पत्नीसोबत अनैसर्गिक कृत्यही केले. पत्नीने त्यास विरोध केला असता, तिला शिवीगाळ केली. पत्नी सध्या ठाणे येथे असलेल्या घरी राहून काम करत आहे. तिचे आणि पतीचे गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू आहेत. पुनावळे येथे हा प्रकार घडला तेव्हा सगळे जण एका पार्टीसाठी आले होते. त्यानंतर सलग तीन दिवस पतीने त्याच्या मित्रांबरोबर पत्नीला शारीरिक संबंध प्रस्थापित करण्यास भाग पाडल्याचे पत्नीचे म्हणणे आहे. रावेत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# उद्धव ठाकरे यांच्या 7 पदाधिकाऱ्यांची जामिनावर न्यायालयातून सुटका

उरण, दि.२० : प्रतिनिधी

महामुंबई सेझ विरोधातील आंदोलनप्रकरणी सुनावणीला सातत्याने गैरहजर राहिल्याने उद्धवसेनेच्या सात पदाधिकाऱ्यांना बेलापूर न्यायालयाने बुधवारी न्यायालयीन कोठडी सुनावली होती. मात्र, गुरुवारी सर्वांची ३० हजारांच्या जामिनावर सुटका झाल्याची माहिती बेलापूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीधर गोरे यांनी दिली. यामध्ये माजी आमदार, जिल्हाप्रमुख मनोहर भोईर, तालुकाध्यक्ष संतोष ठाकूर यांचा समावेश आहे. रिलायन्सच्या महामुंबई सेझविरोधात २००७ साली येथील शेतकऱ्यांनी संघर्षाची भूमिका घेतली होती. या आंदोलनादरम्यान शिवसेनेच्या नेतृत्वाखाली कोकण भवनवर केलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. त्यामुळे आंदोलनकर्त्यांवर गुन्हा दाखल केला होता. त्याची नियमित सुनावणी न्यायालयात सुरू होती. मात्र, आरोपी सुनावणीवेळी सातत्याने गैरहजर राहत असल्याने न्यायालयाने आरोपींविरोधात अटक वॉरंट जारी केले होते. अखेर बुधवारी न्यायालयात हजर केल्यानंतर सातही जणांना न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली होती. यानंतर सातही जणांनी जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती. त्यानुसार त्यांची ३० हजार रुपयांच्या जामिनावर सुटका करण्यात आली.

# शेतकरी समृद्ध होण्यासाठीच प्रयत्न गरजेचे : नितीन गडकरी

## ॲग्रोव्हिजन समितीतर्फे कार्यक्रमाचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २१ :

विदभार्तील शेतकरी समृद्ध संपन्न झाला पाहिजे, याच उद्देशाने ॲग्रोव्हिजन प्रदर्शन सुरू करण्यात आले. स्मार्ट व्हिलेजेस निर्माण व्हावीत, शेतमालाला चांगली बाजारपेठ मिळावे, शेतकऱ्यांचा नफा वाढावा, जोडधंद्यातून रोजगाराची साधने निर्माण व्हावीत, हाच आमचा उद्देश आहे आणि त्याच दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (शनिवार) येथे केले.

ॲग्रोव्हिजन समितीच्या वतीने हॉटेल तुली इम्पेरियलमध्ये आयोजित कार्यक्रमात गडकरी बोलत होते. यावेळी माजी खासदार रामदास तडस, श्रीधर ठाकरे, डॉ. घोष, रवी बोरटकर यांच्यासह समितीचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, आपल्याला संधी कुठे आहे हे शोधले पाहिजे. त्यानंतर यश मिळेल याच दृष्टीकोनातून प्रयत्न करायला हवेत. यंदा ॲग्रोव्हिजन १५ व्या वर्षात पदार्पण करतेय. या पंधरा वर्षात सर्वांच्या सहकायार्मुळे प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मध्य भारतातील सर्वात मोठं कृषी प्रदर्शन म्हणून मान्यता मिळवली. या यशात शेतकऱ्यांचा मोठा सहभाग आहे. मी आज भोपाळ दौऱ्यावर होतो. त्यावेळी मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी ॲग्रोव्हिजन प्रदर्शनाला येण्याची इच्छा व्यक्त केली, असेही ना. श्री. गडकरी म्हणाले. मध्यप्रदेशात आपल्या अनेक गोष्टींचे अनुकरण करण्याची इच्छा असल्याचेही ते म्हणाल्याचे गडकरींनी सांगितले.

प्रत्येक जिल्ह्यात दोनशे काऊ फार्म तयार होतील याद्दष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वप्रकारची मदत करायला मी तयार आहे. फार्मर प्रोड्युस कंपन्या निर्माण केल्या जाव्यात. ते काम सुरु झाले आहे. त्या धरतीवर काऊ फार्म यशस्वी होणे नक्कीच शक्य आहे. त्याचा शेतीला आणि शेतकऱ्यांना नक्कीच फायदा होऊ शकतो, याचा विश्वास असल्याचेही गडकरी म्हणाले.

# सिंधी युवक-युवतींसाठी २३ वी आंतरराष्ट्रीय परिचय परिषद




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. २१ :

ब्रह्मलीन परमपूज्य सतगुरु स्वामी शिवभजन महाराज यांच्या आशीवार्दाने आणि परमपूज्य सतगुरु बाबा नारायण भजन साहेब जी यांच्या मार्गदर्शनाखाली पूज्य समाधा आश्रमात गेल्या 25 वर्षांपासून अनेक सामाजिक सेवा होत आहेत. ज्यामध्ये मॅरेज ब्युरोची सेवाही उपलब्ध आहे. सिंधी समाजातील तरुण-तरुणींचे पालक येतात आणि त्यांच्या मुलांचा बायोडेटा अपलोड करून घेतात आणि समाधा आश्रम त्यांच्या गरजेनुसार त्यांच्यासाठी योग्य स्थळ शोधतो आणि वेबसाईटवर अपलोड करतो.

यामध्ये मुले-मुली किंवा त्यांचे पालक त्यांचा बायोडाटा घरी बसून पाहू शकतात. मॅरेज ब्युरो ऑफिस दररोज सकाळी 11 ते दुपारी 1 आणि संध्याकाळी 7.30 ते रात्री 9.00 वाजेपर्यंत सुरू असते. गेल्या 22 वर्षांपासून, समाधा आश्रम मेरीज ब्युरो आणि सिंधी सोशल फोरम नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सिंथी उच्च शिक्षित तरुण-तरुणींसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिचय परिषदेचे आयोजन केले जाते. ज्यामध्ये समाजाकडून चांगले योगदान दिले जाते आणि यशस्वी होण्यासाठी या परिचय संमेलनात आलेल्या 40 ते 50 टक्के तरुण-तरुणींचे नातेसंबंध जुळतात.

या वर्षीही समधा आश्रम मेडिकल ब्युरो आणि सिंधी सोशल फोरम नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 8 डिसेंबर 2024 रोजी जगत सेलिब्रेशन हॉलमध्ये सकाळी 8 ते सायंकाळी 5 या वेळेत 23 वे परिचय संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

आज या शुभ मुहूर्तावर सिंधी समाजातील सर्व घटकांना विनंती करण्यात येते की त्यांनी समधा आश्रम मॅरेज ब्युरो, बँक कॉलनी, नागपूर 7447626066 आणि सिंधी सोशल फोरम येथे विवाहयोग्य उच्च शिक्षित तरुण-तरुणींनी नोंदणी करावी. दयानंद नगर, नागपूर (78875651147) शंकरलाल रंगलानी गोदिया 9370740143, दिलीप सावलानी 9422147216, प्रकाश चेतवानी 7588763081, मोहन मंजानी 9890070225 अशोक माखिजानी 9822473660 यांच्याशी संपर्क साधा आणि 20/11/2024 पर्यंत फॉर्म सबमिट करा असे आवाहन करण्यात आले आहे.

पूज्य समाधा आश्रमात इतरही अनेक प्रकारच्या सेवा आहे. संगणक तसेच गोठ्यात सुमारे 65 ते 70 गायींची सेवा केली जाते, त्यापैकी 20 दूध देणाऱ्या गायी आहेत, ज्यांचे दूध स्वयंचलित मशीनद्वारे पॉलिथिन पिशव्यांमध्ये पॅक करून वितरित केले जाते. शववाहिनी आणि शवपेटीचीही सोय करण्यात आली आहे. जयपूर फूट कॅम्पचेही आयोजन करण्यात आले आहे. समाधा दवाखान्यातही अनेक प्रकारच्या सेवा पुरवल्या जातात. अशी माहिती समाधान कमिटी कडून पत्र परिषदेमध्ये देण्यात आली.

# आसमान फाऊंडेशन नागपुर तर्फे नवरात्री निमित्त कन्या पूजन व गरीब विद्यार्थ्यांना स्टेशनरी वितरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २१ :

आसमान फाऊंडेशन आणि आसमान महिला क्रेडिट को-ऑप सोसायटी नागपूरच्या तर्फे दरवर्षीप्रमाणे नवरात्री निमित्ताने बेलोना, नरखेड येथील आरघोडे विद्यालय परिसरात कन्या पूजन केले गेले तसेच 200 से हून अधिक विद्यार्थ्यांना स्टेशनरीचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष डॉ.रवि गि-हे यांनी मुलांच्या उज्वल भविष्याची कामना केली.

यावेळी फाउंडेशनच्या अनेक शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमाची माहिती दिली. सौ.विभा विंचुरकर, सहसचिव यांनी महिला सक्षमीकरणावर तर डॉ. साधना थोते यांनी मुलींच्या आरोग्य समस्येवर विचार व्यक मुख्याध्यापक विलिन आरघोडे यांनी गरीब व मध्यमवर्गीय मुलांना प्रोत्साहन दिल्याबद्दल फाऊंडेशनचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमांत फाऊंडेशनचे सचिव नरेश शेंडे, संचालक नरेंद्र विंचुरकर, दिनेश



टेकाडे, आसमान महिला सोसायटीच्या अध्यक्षा मेघा गि-हे, विभा विंचुरकर, डॉ. साधना थोते, छाया मुलताईकर, कुंदा धकाते, दहीकर, रिमांश मुलताईकर, अभिषेक पिंजरकर उपस्थित होते.

## प्रसिद्ध व्हायोलिन वादक म्हैसुरू मंजुनाथ राष्ट्रीय अध्यक्षपदी

**नागपुर :** जगप्रसिद्ध व्हायोलीन वादक डॉ. म्हैसूरू मंजुनाथ यांची संस्कार भारतीचे अखिल भारतीय अध्यक्ष म्हणून निवड झाली असून ज्येष्ठ अभिनेते नीतिश भारद्वाज, सीसीआरटीच्या पूर्व अध्यक्ष, शिक्षणतज्ज्ञ डॉ. हेमलता मोहन आणि विचारवंत डॉ. रवींद्र भारती यांची राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. राजस्थानचे सूरबहारवादक डॉ. अश्विन दळवी राष्ट्रीय महामंत्री असतील. जयपूर, राजस्थान येथे प्रारंभ झालेल्या संस्कार भारतीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आगामी तीन वर्षांकरीता राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

प्रसिद्ध वक्ते व लेखक आशुतोष अडोणी यांचा अखिल भारतीय मंत्री म्हणून कार्यकरिणीत समावेश करण्यात आला आहे. संस्कार भारतीचे नागपूरचे ज्येष्ठ कार्यकर्ते चंद्रकांत घरोटे यांच्याकडे पश्चिम क्षेत्र प्रमुख म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेचे उद्घाटन राजस्थानचे विख्यात चित्रकार पद्मश्री तिलक गीताई, प्रख्यात समाजसेवी पद्मश्री मुन्ना मास्टर यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले.

## मोहसीन रजा पुन्हा जबरी चोरीत गजाआड

**नागपूर :** कामठी परिसरात लुटपाट केल्या प्रकरणी गुन्हे शाखेच्या पथकाने चर्चित गुंड मोहसीन रजा उर्फ गोलू गुलाम रजा (36) याला अटक केली आहे. फिर्यादी प्रितेश नागोसे (38) रा. दत्तनगर, कळमना हे शुक्रवारी रात्री हॉटेलमध्ये जेवण करून दुचाकी वाहनाने घरी जात होते. रस्त्यात कामठी उड्डाणपुलाजवळ ते लघुशंका करण्यासाठी थांबले. या दरम्यान दोन आरोपी त्यांच्याजवळ आले. इतक्या रात्री येथे काय करीत आहेस. येथून महिला येणे-जाणे करतात. प्रितेशने त्यांना माफी मागितली. मात्र आरोपींनी त्यांना मारहाण सुरू केली. मोबाईल फोन आणि सोन्याच्या चेनसह 1.45 लाख रुपयांचा माल लुटला. पोलिसांनी मोबाईल लोकेशनच्या माध्यमातून मोहसीनला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने मित्रासोबत मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेले वाहन जप्त करण्यात आले. लुटीचा माल साथीदाराकडे असल्याचे सांगितले.

## दरोड्याच्या तयारीत चौघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २१ :

कळमना पोलिसांनी गस्ती दरम्यान दरोड्याच्या तयारीत असलेल्या एका टोळीतील चौघांना अटक केली. त्यांचा एक साथीदार फरार होण्यात यशस्वी झाला. पोलिसांनी आरोपींकडून शस्त्रही जप्त केले. मुस्तकीन खान करीम खान (34) रा. गोतमारे लेआऊट, कळमना, मोहम्मद आबिद बाबू अंसारी (30) रा. गरीब नवाजनगर, देवास उर्फ मोनू अनिल यादव (20) रा. आदिवासी प्रकाशनगर आणि राहुल बबलू डोहरे (20) रा. डिप्टी सिग्नल अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. फरार आरोपी आकाश उर्फ टोचू चाचेरकर (19) रा. मिनी मातानगर याचा शोध पोलिस घेत आहेत.

शुक्रवारी मध्यरात्री कळमना पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान पावनगाव बोगद्याजवळ काही असामाजिकतत्व शस्त्रांसह कोणतातरी गुन्हा करण्याच्या तयारीत बसून असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी तेथे धाड टाकली असता वरील आरोपी पोलिसांच्या हाती लागले. झडतीमध्ये त्यांच्याजवळ 2 चाकू, रॉड, टॉर्च आणि तिखट मिळाले.

## हुक्का पार्लरवर धाड

**नागपूर :** बजाजनगर चौकातील हेल कॅफेवर पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर धाड टाकली. तेथे कॅफेच्या आड हुक्का पार्लर सुरू होता.

पोलिसांनी संचालकासह 7 जणांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. अजहर रफीक शेख (38) रा. रामदासपेठ, रेहान नेगी (30) रा. सिव्हील लाईन्स, मणिकांता रेड्डी (23), चेतन रेड्डी (19), वीरबोयना आदित्य वर्धन (19) तिन्ही रा. व्हीएनआयटी कॉलेज, शुभम प्रकाश उईके (30) रा. ओमकारनगर आणि सोनिक विलास विधायतकर (27) रा. संजयनगर, पांढराबोडी अशी आरोपींची नावे आहेत.

बजाजनगर चौकातील हेल कॅफेमध्ये हुक्का पार्लर सुरू आहे. तसेच संचालकाकडून तेथे येणाऱ्या ग्राहकांना तंबाखूजन्य फ्लेव्हर मिश्रित हुक्का दिला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून बजाजनगर पोलिसांनी कॅफेवर धाड टाकली. पुढील तपास पोलीस करीत आहे.

# एसटीच्या भाडेवाढ रद्दमुळे १०० कोटींचा फटका

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर दि. २१ :

राज्य सरकारने दिवाळीत होणारी हंगामी भाडेवाढ रद्द करून प्रवाशांना दिलासा दिला आहे. ही प्रवाश्यांसाठी चांगली बाब आहे. परंतु यात महामंडळाचे अंदाजे १०० कोटी रुपये नुकसान होणार आहे. ही रक्कम शासनाने एसटीला दिली पाहिजे, म्हणजे त्यातून कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट रक्कम देता येईल. त्यामुळे सरकारने तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे. त्यांनी याबाबत आणखी महत्वाची माहिती दिली.

एसटीतील कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट रक्कम देण्यासाठी निधी कमी पडत असल्याने इतर कर्मचाऱ्यां प्रमाणे त्यांना सुद्धा दिवाळी सण साजरा करता यावा, या हेतूने अनेक वर्षे बंद पडलेली दिवाळीसाठी मिळणारी रक्कम दिवाकर रावते परिवहन मंत्री असताना सुरू करण्यात आली. दरम्यान या काळातच एसटीचा महसूल वाढवण्यासाठी हंगामी भाडेवाढ करण्याची योजना अमलात आणली गेली. त्यातून कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट रक्कम दरवर्षी देण्यात येत आहे. दिवाळी सण तोंडावर आल्याने महामंडळाने शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावानुसार अद्याप अर्थसाहाय्य देण्यात



आलेले नाही. ही रक्कम मिळाल्यानंतरच कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट रक्कम देण्याचा विषय मार्गी लागणार आहे.

दिवाळी सण जवळ येत असल्याने महामंडळातील कर्मचाऱ्यांचे लक्ष दिवाळी भेट रक्कमे कडे लागून राहिले आहे. नेमकी कधी मिळणार या विषयीची उत्सुकता कर्मचाऱ्यांना असून राज्य सरकारच्या निदेर्शाने रद्द करण्यात आलेल्या हंगामी भाडेवाढीची प्रतिपूर्ती रक्कम तात्काळ महामंडळाला वर्ग करावी. जेणे करून हा प्रश्न मार्गी लागेल, असेही बरगे यांनी म्हंटले आहे.

दिवाळी हंगामी भाडेवाढ मधून एसटीला साधारण शंभर कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा होती. पण भाडेवाढ मागे घेतल्याने त्यावर पाणी पडले आहे. महामंडळाच्या बस खचाखच भरून जात असल्या, तरी प्रत्यक्ष एसटीच्या तिजोरीत अध्यार्पेक्षाही कमी रक्कम पडते. यातून दैनंदिन खर्च भागविला जातो. प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सवलत मूल्याची रक्कम शासनाकडून दिली जाते, परंतु मागील काही महिन्यांपासून सवलत मूल्याच्या प्रतिपूतीर्ची पूर्ण रक्कम दिली जात नाही. त्या मुळे कर्मचाऱ्यांची देणी थकली असून फक्त पगार होईल एवढीच रक्कम महामंडळाला दरमहा शासनाकडून दिली जात आहे.

दिवाळी भेटीसारखा आर्थिक खर्च करायचा असल्यास महामंडळाला शासनाकडे हात पसरविल्या शिवाय पर्याय राहत नाही. याही वर्षी असाच पेच निर्माण झाला असून कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट देण्यासाठी सुमारे ५५ कोटी रुपयांच्या रक्कमेच्या मागणीचा महामंडळाने शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून त्यावर अद्यापि निर्णय घेण्यात आलेला नाही.

# माळी समाजाला योग्य प्रतिनिधीत्व द्या सकल माळी समाजाची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २१ :

माळी समाज हा महाराष्ट्रात दोन नंबर चा समाज असून एकूण लोकसंख्येच्या ११ टक्के ईतका येतो. या लोक संख्येच्या आधारावर राजकिय पक्षांनी प्रतिनिधीत्व द्यावे अशी मागणी माळी समाजाच्या सर्व संघटणांनी संयुक्त पत्रपरिषद घेऊन केली.

माळी समाजाचे उमेद्वार आणि कार्यकर्ते हे राष्ट्रीय भारतीय जनता पार्टी मध्ये जास्त असल्याने व गेल्या दोन दशकांपासून माळी समाजाचे मत हे भाजपला जात असल्याने भाजप कडून समाजाला जास्त अपेक्षा आहे. विदर्भात माळी समाजाची संख्या २५ लाखा च्या जवळपास आहे. व ही संख्या निर्णायक असून निवडणूक फिरवण्याची ताकत माळी समाजात आहे.

विदर्भात गेल्या १० वषार्पासून भाजप ने प्रतिनिधीत्व दिले नसल्याने समाजात नाराजी आहे. विदर्भात किमान ४ सीट माळी समाजाला मिळायला पाहिजे, अशी अपेक्षा समाजातर्फे व्यक्त होत आहे.

नागपूर जिल्ह्यात दक्षीण नागपूर व काटोल हे माळी बहूल क्षेत्र असल्याने या दोन पैकी एक मतदार संघ माळी समाजाला द्यावा अशी मागणी माळी समाजा तर्फे करण्यात आली. जर या वेळेला माळी समाजाला डावलण्यात आले तर गंभीर परिणाम राजकिय पक्षाला भोगावे लागतील आणि या संबधीची भुमीका तिकिट वाटपानंतर ठरवून त्या प्रमाणे पुढील दिशा ठरवण्यात येईल. या पत्रपरिषदेत विश्वस्त अखिल भारतीय माळी महासंध गोविंद वैराळे, मधुसुदन देशमुख, माळी महरासंघाचे विभागिय अध्यक्ष मुकुंद पोटदुखे, शंकर चौधरी, राहूल पलाडे, डॉ. राजेश कुऱ्हाडे, विनित गणोरकर, राजेंद्र बाठ अध्यक्ष जिरे माळी समाज, ओंकारनाथ कुछवाह पदाधिकारी उपस्थित होते.

# कवितेचा प्रियकर होण्याचा प्रयत्न केला : डॉ. अक्षयकुमार काळे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २१ :

केशवसुतांनी कवी व कवितेचे नाते प्रियकर-प्रेयसीचे असल्याचे म्हटले आहे. पण हे अर्धसत्य असून रसिक हा कवितेचा खरा प्रियकर असतो. हाच रसिक पुढे जाऊन समीक्षक होतो. मी आयुष्यभर रसिक या नात्याने कवितेचा प्रियकर होण्याचा प्रयत्न केला आणि तिने आयुष्यात खूप आनंद दिला, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मराठी समीक्षक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे यांनी केले.

साहित्य अकादेमी, मुंबई आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने समीक्षकासोबत एक संध्याकाळ या विषयावर शनिवारी विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात डॉ. अक्षयकुमार काळे यांचे व्याख्यान पार पडले. त्यांनी यावेळी कवी, कविता आणि समीक्षकाचे भावविश्व कुसुमाग्रज, गालिब, ग्रेस आदी कविंची अनेक उदाहरणे देत



उलगडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते यांची उपस्थिती होते तर च्यासह साहित्य अकादमीच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे यांची उपस्थिती होती.

डॉ. काळे म्हणाले, कवितेच्या ख-या आस्वादासाठी व्यक्तिमत्व मुक्ती, तादात्म्य, धीर अशा गुणांची आवश्यकता असते. हे गुण पूर्णतः माज्यात आहेत की नाही माहिती पण ते संपादण्याचा प्रयत्न केला. या तीन गुणांची साधना केल्यामुळे काव्यानंदात मला आयुष्यभर राहता आले.

ज्यांना कविता कळत नाही, त्याने ती वाचणे सोडून द्यावे व अरसिकतेने त्यावर कोणतेही भाष्य करू नये असे सांगताना त्यांनी गालिब, ग्रेस यांच्यावर दुर्बोधतेची टीका झाली. परंतु त्या कवितांना त्यांच्या कविता कळत होत्या. त्या समजून घेण्याकरिता उच्चस्तराच्या व सूक्ष्मद्दष्टीच्या रसिकाच्या गरज होती, असे सांगताना डॉ. काळे म्हणाले, ज्या अथार्ने कवी कविता लिहितो त्याचे अनेक अर्थ रसिकाच्या मनात निर्माण होतात. कवी आणि कविता वेगवेगळी असते. कविता स्वतंत्रपणे काहीतरी बोलत असते. बालकवींची औदुंबर कवी ही त्याचे साक्षात उदाहरण आहे. लेखकाने साम्यवादी, आंबेडकरीवादी, जडवादी, ईश्वर निरीश्वरवादी, आत्मवादी असता कामा नये. अशा वादांचे सावट आपल्या समीक्षेवर त्याने पडू देऊ नये, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना प्रदीप दाते यांनी साहित्य अकादमीचे आभार मानले. वि. सा. संघाच्या उपक्रमात सहभागी साहित्याच्या माध्यमातून जीवन समृदध करणारे उपक्रम राबविण्यात येतात, असे ते म्हणाले.

डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी स्वागतपर भाषण केले. साहित्य अकादमीच्या विविध उपक्रमांची माहिती देताना त्यांनी डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. तर युगवाणीचे संपादक प्रफुल्ल शिलेदार यांनी प्रास्ताविकातून साहित्य संघाने शंभरीचा टप्पा गाठलेला असताना साहित्य अकादमीचा नवा उपक्रम या संस्थेपासून सुरू होणे, ही महत्वाचा घटना असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन वृषाली देशपांडे यांनी केले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **KRUNAL NILKANTH WANKHEDE.** NOW MY NEW NAME IS **KUNAL NILKANTH WANKHEDE.**
**ADD** : AMBEDKAR WARD RAMTEK PO RAMTEK TH RAMTEK NAGPUR 441106.

MY OLD NAME WAS **MANISH KUMAR GURUNANI.** NOW MY NEW NAME IS **MANISH SANTOSH GURNANI.**
**ADD** : BEHIND HANUMAN MANDIR, PRABHAG NO.07, LAKHANI, BHANDARA 441804.

MY OLD NAME WAS **NAWAB AHMAD LATEEF.** NOW MY NEW NAME IS **NAWAB AHMAD ABDUL LATEEF.**
**ADD** : 19, BALAJI COLONY RANALA, KAMPTEE.

MY OLD NAME WAS **SHAHJAHAN BEGUM SYED MUSHTAQUE.** NOW MY NEW NAME IS **SHAHJAHAN SAYYED MUSHTAQUE.**
**ADD** : AZAD NAGAR GITTIKHADAN KATOL ROAD NAGPUR 440013.

# सगळेच बाशिंग बांधून निवडणुकीला तयार !

आमदार - खासदारांच्या निवडणुकीत बरेचजण डोक्याला बाशिंग बांधून असतात.पक्ष कोणता आहे हे महत्त्वाचे राहिलेले नाही.कारण पक्षांची ध्येय धोरणे ही सगळ्याच पक्षांनी खुंटीला टांगून ठेवलेली आहेत.फक्त ऐनकेन प्रकारे सत्ता हवी आहे.यामुळे विरोधी पक्षांचा दराराच संपुष्टात आलेला आहे.विरोधी नेते हे संसद,विधानसभा आपल्या अभ्यासपूर्ण भाषणाने हादरवून सोडत नाहीत. आज फक्त एकमेकां विरोधात उखाळ्या पाखाळ्या काढल्या जातात.एकमेकां विरोधात गरळ ओकतात आणि तेच निवडून आल्यावर सत्तेसाठी नको ती तडजोड करतात.कुठलाही पक्षीय धर्म हा अस्तित्वात राहिलेला नाही.यामुळे ख-या पक्षीय कार्याकर्त्यांची गोची होते. त्यांना तोंडघशी पाडल्या जाते आहे.पक्षीय कार्यकर्ते मंडळींना कोणता झेंडा हाती घ्यावा हेच कळेनासे झाले आहे.ते संभ्रमात आहेत. प्रमुख लढत आघाडी आणि युतीत असल्याने कार्यकर्ते मंडळींना तीन तीन झेंडे हाती घ्यावी लागतात आहेत.हे आपले राजकीय अपयश मानावे लागेल. यासाठी जनता तेवढीच कारणीभूत ठरते आहे.तिला पण फुकटछाप योजनांची सवय जडते आहे.कुठलेही कष्ट न उपसता महिलांच्या वैयक्तिक खात्यात लाडकी बहीण योजनेची ठराविक रक्कम वळती होत असल्याने महिलांचे चेहरे आनंदी दिसत आहेत.विरोधीपक्ष यावर आग ओकत आहेत. आग ओकणे ही स्वाभाविक प्रतिक्रिया आहे. यावर कुणाचाही आक्षेप असण्याचे कारण नाही.

आमच्या पहाण्यात २०-२५ वर्षाआधी ग्रामपंचायत सरपंच पदासाठी कुणी उभे राहायला पहात नव्हते.जबरदस्तीने उमेदवार उभा करावा लागत होता.आज सरकारने सगळीकडेच गावाच्या विकासासाठी ग्रामपंचायतला मोठ्या प्रमाणावर फंड देण्यास सुरुवात केली आहे. मराठीत एक म्हण आहे.'असतील शिते तर जमतील भुते' !आज जिथे जिथे पैसा उपलब्ध होतो आहे तिथे तिथे राजकारण प्रबळ झाले आहे.आता पैशांचा, सवलतींचा प्रभाव कमी करा निवडणुकीला उभे राहण्यासाठी उमेदवार मिळणार नाहीत. आमदार-खासदारांचीक्रेझ कां वाटते ? कारणं चकाचौंध दुनिया ! निवडून येताच दारासमोर गाडी लागते.सेक्युरीटी गार्ड,जवान मागेपुढे फिरत असतो. साहेबांचे वलय निर्माण होते.एकदम हिरो, हिरोईन झाल्यासारखे वाटते.स्वर्गाला चार हात टेकणेच बाकी राहते.एकदम साहेबांचे जीवनच बदलून जाते.याच कारणाने जो तो आमदार -खासदार होवू पहातो आहे.ही एकमेव चांगली संधी चालून येत असते.यासाठी ना शिक्षणाची अट असते, ना नितीमुल्यांची ! २१ वर्षाचे झाले की जास्तीची अक्कल आलीच म्हणून समजा.फक्त पैसा,पक्ष पाठीशी आणि कामाची, बिनकामाची डोकी भक्कमपणे मागे असतील म्हणजे काम फत्ते झालेच म्हणून समजा. कारण भारतीय लोकशाहीत डोक्यांना महत्व आहे. सध्या निवडून येण्याची क्षमता,पात्रता यालाच पक्षीय महत्त्व प्राप्त झाले आहे.मग तो गुंड-पुंडकां असेना ? शिक्षणाला, तुमच्या विद्वत्तेला कुणीही हुंगत नाही. आंम्हाला राज्य कारभार चालविण्यासाठी आयएएस, आयपीएस आणि उच्च शिक्षीत लोकांची गरज आहे.त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राज्यकारभार व्यवस्थित चालवीता येतो आहे. त्यांची बौद्धिक क्षमता, कौशल्य वापरून चांगला राज्यकारभार



करता येतो.मग लोकप्रतिनिधींना शिक्षणाची गरजच कां ? हा आमचा सर्व मतदारांना विचारलेला एक यक्षप्रश्न आहे ? याचे उत्तर मतदारांना निवडणुकीच्या माध्यमातून मतांव्दारे द्यायचे आहे.यात ते पास होतात की नाही हे काळच ठरवेल. आज निवडणुका लढवीणे हे साधे सोपे काम राहिलेले नाही.पहिले शिक्षीत,अडाणी, फकणचोट(पैसे नसलेला) उमेदवार निवडणुकीला उभे राहत असे.आज असे होने नाही.तेंव्हा निवडणूक लढवायची म्हणजे पैशांची गरज भासत नसे.कारण जनताच निवडणूकीसाठी स्वतःचा पैसा उभा करून उमेदवाराला निवडून आणत असे. आजची परिस्थिती संपुर्णपणे बदललेली आहे. उमेदवारांना लोकांसाठी पैसा खर्च करावा लागतो. पक्षकार्यकर्त्यांना आणण्यासाठी वाहनांची व्यवस्था, खाणंपाण्याची व्यवस्था करावी लागते.याच कारणाने निवडणूक आयोगाने आमदारांच्या खर्चाची मर्यादा रूपये चाळीस लाख तर खासदारांच्या खर्चाची मर्यादा रूपये पंच्याहत्तर लाख ठेवली आहे.मग प्रश्न पडतो आहे की एवढा पैसा एखादा अपक्ष आणि सामान्य उमेदवार कुठून उभा करणार आहे ? तो पैसा एक नंबरचा राहणे शक्यच नाही.हे सर्वांनाच माहित आहे.काळ्या पैशाचाच वापर निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर होत असतो.हे निवडणुक आयोगाला चांगले माहीत आहे.तरीही काळा पैसा निवडणुकीत खर्च करणा-यांची नावे निवडणूक आयोगाला कळवा म्हणून जाहिरातीद्वारे,प्रसार माध्यमांद्वारे जनतेला कळविले जाते.आहे की नाही आपल्या लोकशाही व्यवस्थेची,निवडणूक आयोगाची गंमत जंमत !

पक्ष कार्यकर्त्यांना स्वतःचे अस्तित्वच शिल्लक राहिलेले नाही.ते स्वतःचे निर्णय घेऊ शकत नाहीत.ते फक्त सांगकामे झाले आहेत. पक्ष नेतृत्व सांगेल ती कामे मुकाट्याने करणे एवढेच काम पक्ष कार्यकर्त्यांना राहिलेले आहे.त्यामुळे पक्ष कार्यकर्त्यांना कोणता झेंडा घेऊ हाती हा प्रश्नच पडत नाही.पक्षाचा झेंडा हाती घेणे न घेणे याचे सर्व अधिकार हायकमांडने,पक्षाध्यक्षांनी आपल्या हाती राखून ठेवलेले आहेत.अशी आपल्या लोकशाही व्यवस्थेची दुर्देशा झालेली आहे.याकडे लक्ष वेधने गरजेचे झाले आहे.आघाडी-युतीच्या राजकारणाने पक्षीय मुल्यांची माती केली आहे. याचे भान जनतेला,मतदारांना राहिलेले नाही.हे दुर्भाग्य जनतेच्या नशिबी आलेले आहे.यासाठी शिक्षीत जनता,मतदाता पणं स्वतः तेवढाच जवाबदार आहे. लोकांमध्ये मिसळून याबाबतची जनजागृती करणे हे शिक्षीत लोकांचे काम आहे. उच्च शिक्षीत लोक जे विविध संस्थेत खाजगी, अनुदानित संस्थेत नौकरीवर लागलेले आहेत त्यांच्या मनाची अवस्था मोठी वाईट आहे. त्यांना संस्था चालकांच्या सुचनेनुसार मतदान कुणाला करावे हे ठरवावे लागते आहे.काही अपवाद आहेत.परंतु ते मर्यादित आहेत.या गोष्टीचा पण कुठेतरी विचार व्हायलाच पाहिजे.यामुळे मतदारांचे स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. जे नौकरीत स्थायी आहे त्यांचे ठीक आहे. परंतु जे अस्थिर आहेत त्यांचे काही खरे नाही.फतवा संस्कृतीने तर मतदान स्वातंत्र्यावरच गदा आणलेली आहे. याबाबत निवडणूक आयोग सोईचे धोरणं अवलंबीते आहे. कुणावरही कुठलिही कारवाई होत नाही.याकारणाने गठ्ठा मतांची सोय होते आहे.ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरू पहाते आहे.

विकसीत पाश्चात्य देशात जीथे लोकशाही नांदते आहे तिथे हुजूर (श्रीमंत) आणि मजूर (गरीब) असे दोनच पक्ष पहायला मिळतात. आलटून पालटून त्यांची सत्ता येत आणि जात असते.यामुळे दोन्ही वर्गाला सत्तेत स्थान मिळत असते.सत्ता उपभोगता येते. आपल्याकडे असे नाही.कामगार,मजुर,शेतकरी, कष्टकरी यांचे सत्तेतील स्थान हे नगण्य आहे. आलटून पालटून इंडीया आघाडी किंवा एनडीए यांना केंद्रात सत्ता प्राप्त आहे.सन २०१४ पासून बीजेपीला सत्तेत स्थान मिळाले आहे. या आधी सर्वाधिक वर्षे कॉंग्रेसच सत्तेत होती.आपल्याकडे अशिक्षित वर्गाचे, मतदारांचे प्रमाण जास्त असल्याने या मतदारांना विविध प्रकारचे आमिष दाखवून त्यांची मते खरेदी केली जातात.यात काही शिक्षीत मतदारांचा पणं समावेश पहायला मिळतो आहे. ही अत्यंत दुर्देवाची बाब ठरते आहे. आपल्याकडे म्हणायलाच लोकशाही आहे.प्रत्यक्षात लोकशाही व्यवस्थेवर भांडवलदारांचा विशेष प्रभाव राहात आलेला आहे. यामुळे निवडणुक प्रक्रीयेत पैशांचा अक्षरशः पाऊस पाडला जातो आहे.हे चित्र बदलल्याशिवाय भारतीय लोकशाहीला चांगले दिवस पहायला मिळणार नाहीत. निवडणुका होतील आणि जातील.परंतु जनतेच्या राहणीमानात, डरडोई उत्पन्नात किंचीतही बदल होणार नाही. आपले देशप्रेम, लोकशाही व्यवस्थे बद्दलचे प्रेम किती तकलादू आहे हे यावरून सिद्ध होते आहे.

**मिलिंद गड्डमवार,**
**(सामाजिक कार्यकर्ते)**
**राजुरा**
**मो.क्र. ९५११२१५२००**

# पोलिस हुतात्मा दिन





आज २१ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत -तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो.

२४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते. कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात गणेशोत्सव असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो, तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्ग निर्मित असो की मानव निर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६/११ च्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला.

१९९२ साली मुंबईत झालेल्या जातीय दंगलीतही पोलिसांचे कार्य अतुलनीय असेच होते. कोरोना सारख्या महामारीत तर पोलिसांचे महत्व आणखी अधोरेखित झाले. देशवासियांना कोरोनाच्या महामारीपासून वाचवण्यासाठी पोलिसांनी जे कार्य केले त्याला तोड नाही. कोरोनाने हजारो पोलिसांचा बळी घेतला तरीही पोलीस आपल्या कर्तव्यापासून तसूभरही हलले नाहीत. पंतप्रधानांनी त्यांना त्यांच्या या कार्यासाठी कोव्हिड योद्धा ही उपाधी दिली होती. पंतप्रधानांनी पोलिसांना दिलेली कोव्हीड योद्धा ही उपाधी सर्वार्थाने योग्य होती.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

देशातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या कुटुंबाची पर्वा न करता बारा ते अठरा तास प्रसंगी सुट्टी न घेता कर्तव्यावर राहून मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी अनेक पोलीस जवान शहीद होतात.

दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तींविरुद्ध लढताना काहींना वीरमरण येते. अशा शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यच आहे. या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. हा दिवस देशातील सर्व पोलीस जवान, अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व पवित्र आहे. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन !

## कौतुक प्रत्येकाला आवडते

आज माझ्या सहकाऱ्याचे सहकारी म्हणून सहकार्य केले. (अरे वा! अनुप्रास....) काम फत्ते झाल्यावर दोघांनाही आनंद झाला ; पण मला त्याहून जास्त झाला. कारण काम झाल्यानंतर प्रतिसाद म्हणून धन्यवादापेक्षा आपण हे खूप चांगल्या प्रकारे केले ! हा प्रतिसाद खूप आनंद देवून गेला. अर्थात ते आपले कौतुक होते. मनात होणाऱ्या गुदगुल्या मला काही आवरता आल्या नाहीत. मुळात ते काम सुरू करण्यापूर्वी माझी अजिबात इच्छा नव्हती. आधीच पुष्कळ काम करून शरीर मन दोन्हीही पुरते वैतागून गेले होते. पण कोणाचे मन मोडणे व पुन्हा जोडणे मला जमत नाही म्हणून होकार दिला गेला. सरतेशेवटी सहकाऱ्याच्या त्या मनमोकळ्या कौतुक वर्षावाने सर्वच मरगळ दूर झाली आणि एक नवी ऊर्जा नवीन काम करण्यासाठी अंगात भरल्या गेली.

कौतुक ही एक अशी गोष्ट आहे जे प्रत्येकालाच आवडते. कोणी ते दाखवते, तर कोणी दाखवत नाही पण आवडण्याचा भाव हा आतमध्ये सारखाच असतो. कोणी कौतुक करावे म्हणून काम करते, तर कोणी आपले ते काम आहे म्हणून करते तर कोणी ते करावे लागते म्हणून करते. पण सरतेशेवटी जो कौतुकाचा वर्षाव असतो ते आवडणार नाही आणि पुन्हा कामासाठी ते प्रेरक ठरणार नाही असे बहुदा कोणी नसते. राव, रंक, लहान ,थोर सर्व यात सारखेच गुंफले आहेत. कोणाला मोठ्याकडून त्या कौतुकाची अपेक्षा असते तर कधी लहानगेही नकळत खरे बोलून जातात जे आपले मन खुलविण्यासाठी पुरेसे असते.

कौतुक म्हणजे एक शाब्दिक बक्षीस आहे. जिथे पैसा खर्च करण्याची गरज नाही, जिथे आपल्याकडून अधिकचे कष्ट उपसण्याची गरज नाही. फक्त कौतुकाला स्पर्श करणारे चार गोड शब्द तेवढे बोलावे लागतील. ते गोड शब्द असे काही जादू करतात की खिन्न पडलेला चेहराही खुलून जातो. आनंद कितीही दाखवू नाही म्हटले तरी चेहऱ्यावरची लाली काही लपता लपत नाही.

प्रत्येक गोष्टीच्या एक शोध असतो जो कोणी न कोणी कधीतरी घेतलेला असतो; आणि प्रत्येक शोध हा गरजेतूनच निर्माण झालेला आहे. (काही बाबतीत जिज्ञासा पण असते.) पण कौतुक ही बाब मुळात शोधली गेली ती आपले काम काढून घेण्यासाठी ; ज्यात कौतुक अगोदर केले गेले आणि काम नंतर. जिथे कौतुक आधी व काम नंतर करायचे असते तिथे स्वार्थ दाटलेला असतो. कारण काहीतरी कोणाकडून काढून घ्यायचे असते. तर ज्याठिकाणी काम आधी व कौतुक नंतर असते तिथे खऱ्या अर्थाने शाब्दिक वंदन केले जाते. जे तुमच्यातल्या गुणांची खरीखुरी पोहचपावती/पारख असते. सारखे कौतुक करत राहणे हे एखाद्या माणसाचा चांगुलपणा सांगून जाते तर कधी भविष्याचे नियोजन म्हणूनही पाहता येईल ज्यात एखाद्याची दूरदृष्टीही असू शकते. सगळ्यात महत्वाचे सांगायचे म्हणजे एखाद्याला दुषणे देणे सोपे आहे, माघारी किंवा समोरची टीका, लावालावी सर्वच सोपी आहे पण एखाद्याचे थेट तोंडावर त्याहून त्या माघाऱ्या कौतुक करणे फारच कठीण. कठीण या अर्थाने की इतक्यात कोणाचे चांगले कोणाला दिसेनासे झाले. ज्यांना दिसले ते सांगायला तयार नाहीत. मुळात चांगली माणसे कमी, वाईट वृत्तीची जास्त वाढत आहेत. यामागे कारण हे की हीच चांगली म्हणवली गेलेली माणसे स्वतः चे कौतुक ऐकायला आसुसलेली आहेत पण दुसऱ्यांसाठी कधी अवाक उच्चारत नाहीत. जिथे चांगल्यांचा परीघ वाढू पाहतोय तिथे हेच चांगले अडसर ठरत आहेत. टोमॅटोचे बी टाकल्यावर टोमॅटो नक्कीच येईल पण मिरचीचे बी टाकल्यावर टोमॅटो थोडे येणार आहे, नेमके तसेच चांगुलपणा वाढविण्यासाठी चांगल्यांनांचा सामोरे यावे लागेल. वाईटांचे थोडे ते काम आहे.

गुणग्राहकता नावाची एक गोष्ट आहे ज्यात लोकांतले गुण पाहून ते अंगी बाणावे लागतात. तसे वागताना कधी तोंडातून गोड निघत असेल तर ते आपसूक जावू द्यावे लागते. दुसऱ्यांचे कौतुक केल्यावर पण एक समाधान लाभते ; ते समाधान आपण दूर ठेवून ह्या निरामय जगाचा निरोप घेणे उचित नाही.

अगोदर सांगितल्याप्रमाणे कौतुक करण्यापेक्षा ऐकणे हे प्रत्येकाला आवडते. तिथे तुमच्या या अधिक बखान स्वभावाचा लोकं गैरफायदा पण घेवू शकतात. जी आधीच मीस्वार्थीगटात उलगडलेली आहेत. त्यांपासून आपण सावध राहणे आवश्यक आहे. आपण कोणाच्या कामी येत असू तर ते आपले सद्भाग्यच आहे. कोणाची मदत केल्याने आपले हात बळकटच होत असतात. जसे ज्ञान दिल्याने वाढते तसेच काही. स्वार्थ साधणारे स्वार्थ साधत असतील तरी काही हरकत नाही. आपण एखाद्याच्या कामी उतरलो ही गोष्ट काय कमी मोठी आहे! पण समोरचा व्यक्ती जर आपली मुर्खात तुलना करून स्वार्थ साधत असेल आणि आपल्याला ते कळत नसेल तर आपण मूर्खच होवूत ; आणि त्याच प्रवर्गात रमण्यात आपण वेळ घालत असू तर वेळ वाया तर गेलाच पण एका चुकीच्या व्यक्तीसाठी गेला ही बाब खूप मोठी व त्याहून जास्त वेदनादायी आहे.

# देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण

दि. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख येथे चीनच्या सैनिकासोबत लढतांना केंद्रीय राखीव दलाच्या दहा जवानांनी प्राणाची आहुती दिली होती. त्यानंतरपासून २१ ऑक्टोबर हा पोलिस हुतात्मा दिन म्हणून साजरा केला जातो. वर्षभरात जे जवान देशात आणि राज्यात शहीद झाले अशा जवानांना या दिवशी श्रद्धांजली वाहिली जाते.

पोलीस स्मृतिदिन दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस भारत देशाची सुरक्षा आणि नागरिकांचे रक्षण करताना शहीद झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी समर्पित आहे. सन १९५९ साली लडाखच्या हिंद-चीनसीमेवर चीनी सैनिकांनी भारतीय पोलिसांवर केलेल्या हल्ल्यात १० भारतीय पोलीस शहीद झाले होते. त्यांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. या दिवशी देशभरात पोलीस दलातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शहीद पोलीस जवानांना आदरांजली वाहून त्यांच्या कुटुंबीयांना सन्मानित केले जाते. पोलीस दल देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी अहोरात्र कार्यरत असतात आणि त्यांचे योगदान समाजासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. पोलीसस्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांच्या त्यागाची आणि देशासाठी दिलेल्या सेवेची आठवण करून दिली जाते. हा दिवस पोलीस दलातील अधिकारी आणि जवानांच्या कर्तव्यदक्षतेचा सन्मान करण्याचा दिवस आहे, ज्यांनी आपल्या जीवनाची आहुती देऊन देशवासीयांचे रक्षण केले.

पोलीस हुतात्मा दिन-देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण करण्यासाठी, कधी नक्षल्यांविरोधात तर कधी समाजविघातक कृत्य करणाऱ्यांविरोधात कारवाई करताना, कर्तव्यात कसूर न करता वीरमरण प्राप्त झालेल्या पोलीस जवानांची आठवण मनात तेवत ठेऊन श्रद्धांजली वाहण्यासाठी देशभरात हा दिवस पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण करण्यासाठी, कधी नक्षल्यांविरोधात तर कधी समाजविघातक कृत्य करणाऱ्यांविरोधात कारवाई करताना, कर्तव्यात कसूर न करता वीरमरण प्राप्त झालेल्या पोलीस जवानांची आठवण मनात तेवत ठेऊन श्रद्धांजली वाहण्यासाठी देशभरात हा दिवस पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. देशासाठी आपले कर्तव्य बजावताना आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूर पोलिसांचे स्मरण ठेवण्यासाठी आणि त्यांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी पोलिस स्मृतिदिन साजरा केला जातो.

दिनांक २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख येथे चीनच्या सैनिकासोबत लढतांना केंद्रीय राखीव दलाच्या दहा जवानांनी प्राणाची आहुती दिली होती. त्यानंतरपासून २१ ऑक्टोबर हा पोलिस हुतात्मा दिन म्हणून साजरा केला जातो. वर्षभरात जे जवान देशात आणि राज्यात शहीद झाले अशा जवानांना याच दिवशी श्रद्धांजलीही वाहिली जाते. जिल्ह्याच्या मुख्यालयामध्ये या निमित्ताने शहीद पोलिसांना अभिवादन करण्यात येते. यासोबतच विविध उपक्रमाचे आयोजनही करण्यात येते.

सन २०१८ मध्ये पोलिस स्मृतिदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीमध्ये पहिल्याच राष्ट्रीय पोलिस स्मारकाचे उद्घाटन केले. त्यांनी पोलिस दलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना अभिवादन केले आणि देशातील लोकांना पोलिस म्यूझियम भेट देण्याचे आवाहन केले. आज राष्ट्रीय पोलिस मेमोरियलने सन १९४७ नंतरपासून आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व केंद्रीय आणि राज्य पोलिस दलाच्या ३४,८४४ पोलिस कर्मचाऱ्यांचे स्मरण केले जाते.

महाराष्ट्र पोलिसांकडूनही अभिवादन कार्यक्रम आयोजित केला जातो. आपले कर्तव्य पार पाडत असताना देशासाठी प्राण गमावलेल्या हुतात्म्यांना पोलीस स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र पोलीस दलाच्या वतीने आदरांजली वाहण्यात येते. हे राष्ट्र त्यांचे बलिदान कधीच विसरणार नाही. असे म्हणत महाराष्ट्र पोलिसांकडून अभिवादन केले जाते.

राष्ट्रीय पोलिस स्मृतिदिनानिमित्त समस्त शहीद जवानांना सॅल्यूट !!!,.. जय हिंद! जय जवान!! जय किसान !!!

**-संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार आनंदी-गोविंदनिकोडे गुरूजी**
**(एक शेतकरीपुत्र)**
**वंद. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली, जि. गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप-९४२३७१४८८३.**

# तेव्हाच !, शेतकरी राज्य येईल ?




भारताच्या इतिहासात आर्थिक स्वातंत्र्याचे धोरणाचा शेतकरी नेता या देशात पंतप्रधान व राष्ट्रपती हे दोघेही एकाच पंचवार्षिक काळात स्थानापन्न असतील, तोच दिवस खऱ्या अर्थाने शेतकरी व शेतमजुरांच्या जीवनात भाग्यशाली दिवस असेल ? तेव्हापासून शेतकऱ्यांना न्याय, अधिकार व हक्क मिळण्यास सुरुवात होईल. भारत हा कृषिप्रधान देश असून अनेक जन-जातीचा समाज गुण्यागोविंदाने एकत्र राहतो. आणि बहुतांश लोकांचा व्यवसाय शेती आहे. सरकारच्या धोरणात शेतकरी सुखी होण्यासाठी शेतीवरील प्रक्रिया उद्योग उभारून, शेतीचे नवीन- नवीन संशोधन, तंत्रज्ञान विकसित करून, तसेच शेतीवरचा खर्च कमी करून, शेतीचे उत्पादन कसे वाढेल, व शेतकरी सुखी कसा होईल यावर सर्व चिंतन मनन झाले ? मग भारत सरकारने एवढी मोठी शेतकऱ्यांसाठी विकास यंत्रणा पाठीमागे लावली, कीटक नाशके, रासायनिक खते, जैविक शेती, त्यासाठी जागतिक पातळीवरील वेगवेगळी प्रयोग झालित. तरी गेल्या ७५ वर्षात शेतकरी कां सुखी झाला नाही, हा प्रश्न मात्र आजही अनुत्तरीतच राहिला आहे ?. भारत देशात सरकारची एक यंत्रणा शेतीचे उत्पादन वाढवून शहरे पोसण्यासाठी काम करते, तर सरकारचीच दुसरी यंत्रणा शेतीमालाला भाव मिळू नये,याचे नियोजनपूर्वक काम करते. कधी ते आयात- निर्यात धोरणात ,तर कधी नैसर्गिक आपत्तीच्या संकटात, तर कधी जागतिक महायुद्धाचे निमित्याने त्यांचे डावपेच सफल होते. किंवा जाती-मातीत धर्माची भांडणे लावून, तसेच अनेक बॉम्बस्फोट घडवून, किंवा शेतकऱ्यांना अनुदान वाटप करून निवडणूक काळात दिशाभूल केली जाते. अश्यामध्येच सर्व शेतकरी व्यवस्था बळी पडण्याचे कटकारस्थान रचल्या जाते.

भारत देशातील राजनीति सुद्धा शेतकरी व्यवस्थेला विरोध करूनच केल्या जाते हेच शेतकऱ्यांचे दुर्भाग्य आहे? शेतीच्या उत्पादन वाढीला धरून व शेतकऱ्यांच्या घरात येणाऱ्या आर्थिक स्त्रोताला सोडून ,भारत देशात राजकारण होते. इथेच या देशातील दुटप्पी धोरणामुळे, शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यात पाणी मूरते. शेतकऱ्याला सुखी करण्याचे व शेतकऱ्यांना मारण्याचे दुटप्पी नाटक केल्या जाते. विधानसभा-लोकसभामध्ये शेतीवर जगणाऱ्यापैकी अनेक जातीचे लोक निवडून पाठविल्या जातात? परंतु एकमात्र महत्त्वाची दखल घेतल्या जाते. शेती प्रश्नाची जाण नसलेली माणसे विधानसभेत -लोकसभेत पाठविल्या गेल्यामुळे शेतीमालाला भाव मागणारी यंत्रणाच तिथे नसते. आणि हे सर्व जाणीवपूर्वक घडविले जात आहे. स्वातंत्र्यचे अगोदरचे काळात, व स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्याही काळात शेती आणि शेतकरी प्रश्न ७५ वर्षात सुटला नाही, याला कारणीभूत शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे मारेकरी कॉंग्रेस व बीजेपीची राजवट असून या देशात कलह व आत्महत्या घडविणारे हेच दोन मुख्य पक्ष आहेत. शासकीय व राजकीय यंत्रणाजी शेतकरी सुखी झाली म्हणून बोंबलत आहे, तीच दुसरी यंत्रणा शेतकऱ्यांना आर्थिक कमजोर करण्यासाठी वापरल्या जात आहे ? हेच शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. हेच आता आत्महत्या वरून आता स्पष्ट झाले आहे ? भारत देशातील सरकारी यंत्रणा शेतकऱ्याने जोडधंदे करावे, हेच सांगत आली . म्हणजे शेती व्यवसाय न परडविनारा आहे तरी तो जबरदस्तीने, गांजर दाखवून करावा. असेच केंद्र सरकारचे म्हणणे आहे काय ?. शेतीमालाला भाव कमी ठेवून, जिल्हा परिषदेच्या सरकारी शाळा, सरकारी स्वस्त धान्याचे दुकान, सरकारी दवाखाने उघडल्या जात आहे. शेतकरी उत्पन्नाचे खोटे दाखले तलाठी व तहसीलदाराकडून दिल्या जात आहे. कारण शेतकऱ्याजवळ पैसा नाही, तर तो जगेल कसा हे सरकारला माहित आहे ? शेतीतील कच्चा माल,व्यापार पेठेत गेल्याशिवाय औद्योगीकरण सुरू होत नाही, म्हणून शेतीमालाचे भाव कमी ठेवून शेतकरी अडचणीत राहीला तरच शेतमाल व्यापार पेठेत येईल व औद्योगीकरण यंत्रणा ही सुरळीत चालेल, हेच धोरण केंद्र सरकारचे आज पर्यंत राहीले, पुढेही तसेच राहील.

म्हणजेच कॉंग्रेस व बीजेपी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून, या दोन्ही व्यवस्था शेतकरी विरोधी आहेत. या भारत देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक धोरण व महात्मा फुले यांची विचारधारा, शिवाजी महाराजांचा आर्थिक दृष्टिकोन संपविण्याचा आटोकाट प्रयत्न चालू आहे. हे दोन्ही राजकीय पक्ष देश पातळीवर चुकीच्या धोरणाने वागत असून राजनीतीच्या भामटेगिरीत शेतीनिष्ठ व्यवस्थाच संपविली जात आहे. आता तर एकच नारा..... कॉंग्रेस-बीजेपीहटाओ, भारत देश बचाओ ,भारत देश का किसान बचाओ. तसेच दुसरी बाब लक्षात येते की, कृषीप्रधान देशात औद्योगीकरण धोरण जोरात, मात्र शेतकरी कोमात अशीच अवस्था दिसते आहे .



: लेखक :
**धनंजय पाटील काकडे**
(ज्येष्ठ साहित्यिक व शेतकरी चळवळीतील नेते)
अध्यक्ष, शेतकरी, वारकरी-कष्टकरी महासंघ, महाराष्ट्र राज्य.
मो.क्र. ९८९०३६८०५८

शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे मारेकरी कॉंग्रेस व बीजेपी हे दोन्ही पक्ष असून या देशात जाती-धर्मातकलह पसरवून राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी उल्लू बनविले जात आहे. त्यामुळेच प्रत्येक जाती व धर्माची लोक शासनातील हिसा मागण्यासाठी आरक्षणाची व्यवस्था पुढे करीत आहे. तेव्हा आता घराणेशाहीची वंशावळ संपवावी लागेल, तीच ती मंडळी सत्तेत निवडून येऊन लोकशाही धोक्यात आणित आहे. ज्या आमदार-खासदारांची दोन टर्म झाली असेल. ते फक्त पक्षाचे पालन करणारे बाडगूळ असतात. ते नवीन कोणताही बदल घडवु शकत नाही. त्यांना आता मतदारांनी घरी बसविण्याची वेळ आली आहे. आता महाराष्ट्रातील निवडणुका आहेत, महाविकास किंवा महायुती यांची बी टीम न बनता नवीन चिरफाड करूनच नवीन संघर्ष उभा केला तरच महाराष्ट्राची शान डौलाने दिसेल. तसेच शेतकऱ्यांनी स्वतःच घात करून घेतला, शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या सतत पाठीशी न राहता राजकीय पक्षातील सत्ताधीशाच्या मागे लागून स्वतःच्या आत्महत्या करून घेतल्यात ? त्यामुळे शेतकरी नेते सुद्धा अहवाल दिल होऊन राजकीय पक्षाच्या पाठीशी लागलेत ? त्यामुळे शेतकरी नेत्यांची सुद्धा दैना अवस्था झाली व हे जुने सत्ताधीश त्यांना सत्तेत पोहोचू देत नाहीत. आतापर्यंत ज्या राजकीय पक्षांनी शेतकरी संपविण्याचे काम केले, त्यांच्याच पाठीशी राजकीय लालसेपोटी (ग्रामपंचायत, पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती, को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निमित्ताने) शेतकरी पुन्हा चुकीच्या दिशेने उभा राहिला, हेच आता शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे? शेतकऱ्यांच्या अन्नात माती कालवून, तडजोळीचे राजकारण व धोकेबाज आंदोलने करणारी नेते, डबरूबाज नौटंकी नेते तयार झाली आहेत. महाराष्ट्र हे भारत देशातील अर्थार्जनाचे एक केंद्रबिंदू राज्य आहे. सध्याच्या राजनीतीतील सत्ताधीशांनी शेतकरी प्रश्न हा अर्धवट झुलवत ठेवून, जाती धर्म कलह लावणारी राजनीति कार्यान्वित केली, त्यामुळें आता शेतकरी प्रश्न सुटूच शकत नाही.

आर्थिक स्वातंत्र्यासाठी स्वतंत्र शेतकरी मंत्रालय तयार होणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना न्याय व हक्कासाठी स्वतंत्र कृषी न्यायालय ही व्यवस्था परिपूर्ण बदल करवी लागेल, त्यासाठी या देशाचा पंतप्रधान व राष्ट्रपती हे दोघंही शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या धोरणाचे, व अभ्यासपूर्ण विचाराचे असावे लागतील. पाच वर्षाचा काळ परिपूर्ण करणारा एकही शेतकरी पंतप्रधान टिकू दिला जात नाही. व शेतकऱ्यांना न्याय देणारा राष्ट्रपती होऊ दिला नाही हेच भारतीय शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे? त्यासाठी शेतकरी प्रश्न व शेतकरी हिताचे कायदे दुरुस्त करणारा, पंतप्रधान व राष्ट्रपती एकाच पंचवार्षिक काळात विराजमान असतील, तेव्हाच शेतकरी राज्य येईल? व नव्याने शेतकरी क्रांतीचा उदय होईल.

जय भारत.. जय बळीराजा.

## अशोकायन...

### ग्राम गीतेचे महात्म्य

करावे वाचन चिंतन
संवादातून करा कृती
गावाची होईल प्रगती
ही आहे ग्रामगीतेची शक्ती . !

ग्रामगीतेचे राज्यकर्ते व
जनतेने केला अंगीकार
तर रामराज्याचे स्वप्न
निश्चीत होते साकार ..!

संत तुकडोजींची वाणी
दिव्यत्वाची अनुभूती
आम्हीच आहोत करंटे
म्हणून होतेय अधोगती ..!



**प्रा.अशोक सारडा मेहकर**
**(९४२२३९४३३९)**

# पारशिवनी व कन्हान येथे मुलाखत प्रशिक्षण शिबीरास मुले आणि मुलींचा प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २१ :

पारशिवनी आणि कन्हान येथे चंद्रपाल चौकसे लोकसेवा प्रतिष्ठान मनसर - रामटेक द्वारे आयोजित रोजगार महोत्सव २०२४ च्या अनुषंगाने बुधवार दिनांक १६ ऑक्टोंबर ला मुलाखत पुर्व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या मुलाखत पूर्व मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन पर्यटक मित्र चंद्रपाल चौकसे यांचा शुभहस्ते करण्यात आले . या मुलाखत पूर्व मार्गदर्शन शिबिरास परिसरातील बेरोजगार तरुण मुल - मुली आणि महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला . शिबिरात अभिषेक गुरखेडे यांनी तरुण मुल , मुलींना , व महिलांना इंटरव्यू साठी कशी तयारी करायची, कसं बोलायचं, डॉक्युमेंट काय-काय आणायचे, आपला बायोडाटा कसा बनवायचा यावर मार्गदर्शन केले.



शिक्षित आणि कुशल तरुण मुल मुलींना यशस्वी करिअर सुरु करण्याची संधी मिळावी या उद्देशाने चंद्रपाल चौकसे यांच्या संकल्पनेतून आज रविवार दिनांक २० ऑक्टोंबर ला शांती मंगल कार्यालय, रामटेक येथे भव्य रोजगार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

देशातील ५० पेक्षा अधिक कंपन्या सहभागी होणार आहे . ज्यामध्ये आय.टी. बँकिंग, मॅन्युफॅक्चरींग रिटेल, ॲग्रीकल्चरल, फायनान्स, फार्मा, नर्सिंग, डिलिव्हरी बॉय, लॉजिस्टिक्स सह क्षेत्रातील नामवंत कंपन्या या रोजगार महोत्सवात सहभागी होणार आहेत.

५००० पेक्षा अधिक पदासाठी थेट मुलाखती घेतल्या जाणार असून पात्र उमेदवारांना तात्काळ नियुक्ती पत्र दिले जाणार आहे. १०वी, १२ वी, ग्रॅज्युएट, आय.टी. आय उमेदवारांनी लवकरात लवकर नोंदणी करून या भव्य रोजगार महोत्सवाचा लाभ घेण्याचे आव्हाहन चंद्रपाल चौकसे यांनी बेरोजगार मुल आणि मुलींना केले आहे.

# जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाची रमण विज्ञान केंद्रात शैक्षणिक सहल



■ महासागर प्रतिनिधी
वाडी , दि. २१ :

येथीक जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाने नागपूरच्या रामन विज्ञान केंद्रात शैक्षणिक अभ्यास दौरा आयोजित केला होता. ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान वाढवणे आणि त्यांना त्यांच्या असाइनमेंटमध्ये मदत करणे हे आहे. या सहलीचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय टेकाडे यांच्या नेतृत्वाखाली डॉ.गजानन झाडे व डॉ.नरेंद्र घारड यांनी केले.

रमन सायन्स केंद्र हे एक प्रसिद्ध विज्ञान केंद्र, तीन परस्परसंवादी गॅलरी, एक १३३ आसनांचे तारांगण, एक ऐतिहासीक प्राणी संग्रालय , मनोरंजक, विज्ञान प्रदर्शने आणि इतर विविध क्रियाकलाप आहेत. हे नियमितपणे विज्ञान व्याख्याने, चित्रपट शो आणि ३ डीद्वारे विज्ञानाचे सादरीकरण केले.

संचालन भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक प्रणाली कामतवार, संदीप तिजारे, गणित विभागाच्या प्राध्यापिका ऐश्वर्या गावंडे यांनी केले. सहलीच्या यशस्वी समन्वयासाठी विद्यार्थ्यानी सहभाग सहकार्य केले.

# स्वच्छता ही सेवा कार्यक्रम संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २१ :

माय भारत स्वच्छता ही सेवक हा कार्यक्रम दिनांक ७ व ८ ऑक्टोबर २०२४ ला नवीन येरखेडा येथे नेहरू युवा केंद्र नागपुरच्या संयुक्त विद्यमाने माय भारत स्वच्छता कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन पायल तोषवाल, रूपा सपहा, वैशाली गुहे, सेजल चकबैस, महेक सिंगीतवार आदी उपस्थीत होते. या दिवशीच वरील कार्यक्रमा अतंर्गत रॅली, स्वच्छता तसेच स्वच्छता विषयी उपस्थितांना माहीती देण्यात आली. यावेळी निखिल तौखवाल, दशरथ काळसापे, आयुष ऊके, पियुष साखरकर, योगेश कांबळे, अनंत धारगावे, समर्थ सकट, अतीश कोढल, साहिल उईके, मोहित कुंभरे, मानव निकुरे, प्रथमेश पहाडे, आनंद, अर्पित पाटील, संतोष मेश्राम, प्रज्वल कांबळे, जीवन धोटे, मयुर राऊत आदी विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

# जागतिक अन्न दिनानिमित्त शाळेतील मुलांना मिळाली खाऊची दिवाळी स्नेहभेट



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २१ :

कांद्री माईन येथील प्रकाश हायस्कूल व ज्युनियर कॉलेज येथे जागतिक अन्न दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना रोटी फाउंडेशन मुबंईच्या वतीने दिवाळी स्नेहभेट देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सवार्गीण विकासासाठी मदतीचा हात पुढे करण्यात रोटी फाउंडेशन मुंबई कार्यरत आहे. सेवानिवृत्त पोलिस महासंचालक डी. शिवानंद यांच्याद्वारे संचालित रोटी फाउंडेशन मुंबई नागपूर जिल्ह्यात विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत आहे.

बुधवारी (ता.१६) जागतिक अन्न दिनानिमित्त प्रकाश हायस्कूल व ज्युनियर कॉलेज कान्द्री-माईन शाळेत झालेल्या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांना समोसा, केळी, मिठाई व चिक्की या साहित्याचे वाटप करण्यात आले. मुंबई येथील प्रसिद्ध उद्योजक व रोटी फाउंडेशनचे समन्वयक सी. एम. बगडीया यांच्या सहकार्याने व संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई येथील प्रसिद्ध उद्योजक व रोटी फाउंडेशनचे समन्वयक सी.एम. बगडीया, ओबीसी चळवळीचे शिलेदार व रोटी फाउंडेशन मुंबईचे समन्वयक संजय पन्नासे, मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे, मॉयलचे कर्मिक अधिकारी डॉ. अमितकुमार सिंग उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यांना शालेय वयातच मदतीचा व प्रेमाचा हात हवा असतो.

हा हात योग्य वेळी मिळाल्यास विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरिक व बौद्धिक विकास परिपक्व होत असल्याचे मत कार्यक्रमाचे आयोजक मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे यांनी व्यक्त केले. मॉयलचे कार्मिक अधिकारी डॉ. अमितकुमार सिंग यांनी जागतिक अन्न दिनानिमित्त विद्यार्थ्यांकडून शपथ घेतली. संचालन कामिनी पाटील यांनी केले. उपस्थितांचे आभार विजय लांडे यांनी मानले.

# वेळेचा सदुपयोग करून जिवनाचे सार्थक करा : डॉ. संजय टेकाडे



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

पुस्तका वर प्रेम करा व वेळेचा सदुपयोग करून आपल्या जीवनाचे सार्थक करा असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांनी केले. येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय विभाग व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिवस' व ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्ही.एस.पी.एम. संस्थेचे सचिव तसेच जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाचे संचालक युवराज चालखोर होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून वानखेडे महाविद्यालय येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. अंजली जोशी, प्राचार्य डॉ. संजय टेकाडे, आय.क्यू ए.सी. समन्वयक डॉ. नरेंद्र घारड उपस्थित होते. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी व वाचनातून उद्याचा सुजाण नागरिक घडावा असा संदेश देत 'वाचाल तर वाचाल 'असे डॉ. अंजली जोशी यांनी सांगितले. प्रास्ताविक डॉ. प्रेमलता कुऱ्हेकर यांनी केले.

संचालन प्रा. लता झोड यांनी तर आभार डॉ. कल्पना बोरकर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

# दीनानाथ हायस्कुल विजेतेपद पटकावित विभागीय स्पर्धेत प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २१ :

दीनानाथ हायस्कुल नागपुर मुलांच्या संघा ने नागपुर महानगर जिल्हा टग ऑफ वॉर (रसी खेच) स्पर्धेत एकतर्फी विजेतेपद पटकावित चंद्रपूर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेत आपल्या संघाचा प्रवेश निश्चित केला आहे. यात नऊ पैकी सात कन्हान च्या विद्यार्थी खेडाळुंचे नागपुर महानगरात सुध्दा उत्कृष्ट खेळले.



मंगळवार (दि.१६) ऑक्टोंबर ला मानकापुर क्रिडा संकुल नागपुर येथे नागपुर महानगर पालिका जिल्हास्तरिय टग ऑफ वार (रसी खेच) स्पर्धेत दीनानाथ हायस्कुल नागपुरच्या १७ वर्ष वयोगटात मुलांच्या संघाने एकत र्फी झालेल्या लढतीत दीनानाथ संघाने सोमलवार हायस्कुल रामदास पेठ चा २ - ० असा धुव्वा उडवत विजेतेपद पटकावित चंद्रपुर येथे होणा-या विभागिय स्पर्धेत आपल्या संघाचा प्रवेश निश्चित केला आहे. यात विजेत्या संघ खेडाळु विनित लुहोरे, आयुष दहिफळकर, उत्कर्ष रहाटे, यशश देशमुख, अथर्व चौकसे, अंश मोहने, तनिश मानकर, सोहम श्रीवास आणि रोमहर्ष महाजन आदींचा समावेश होता.

यात नऊ पैकी सात विद्यार्थी खेडाळु हे कन्हान शहरातील आहे. डीएसओ टग ऑफ वॉर विजेतेपद पटकावल्यानंतर दीनानाथ हायस्कुलच्या मुलांचा संघाचे बंगाली एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापनाचे सदस्य, प्रशासक तृप्ती घोष, मुख्याध्यापकआलोक कुमार सिन्हा, उपमुख्या ध्यापक दिपंविता गांगुली, पर्यवेक्षक अंजू सेठ, सर्व शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी वृंदानी शाळेच्या विजेता संघाचे आणि त्यांचे प्रशिक्षक रमेश मंडल सर यांचे अभिनंदन केले. तसेच सर्व खेडाळुंना पुढील यशा करिता शुभेच्छा दिल्या आहे.

# नितु मयूर काळे यांना पी.एच.डी.

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २१ :

येथील रहिवासी व किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसी, कामठी येथे कार्यरत अशिस्टन्ट प्रोफेसर नितु मयूर काळे यांना सावित्रीबाई फुले युनिव्हर्सिटी, पुणे कडून पी.एच.डी.पदवी प्रदान करण्यात आली आहे.



"इफेक्ट ऑफ अँगर्म्यॉटिन ऑन न्युरोडेव्हलोपमेंटल डिसॉर्डर्स" हा त्यांचा शोधप्रबंधनाचा विषय होता. या विषयाकरिता त्यांना डॉक्टर अमन उपगन्लावार, डॉ ब्रिजेश ताकसांडे आणि डॉ मिलिंद उमेकर यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २१ :

नगर पंचायत कांद्री(कन्हान) कार्यालयात दिनांक १७ ऑक्टोंबर २०२४ ला गुरुवारला संस्कृतचे प्रथम कवि त्याचप्रमाणे रामायण रचनाकार महर्षि वाल्मिकी जयंती सोहळा कार्यालयात साजरा करण्यात आला.

त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून वंदन केले. या वेळी नगर पंचायत कांद्री(कन्हान) चे मुख्याधिकारी सचिन गाढवे, लेखापाल हरीशचंद्र ठाकरे, स्वप्नील बनसोडे, संजयकुमार शिंदे, बेबीनंदा लिंगायत,चंदा वैद्य, सतीश मधुमटके, सोनू मधुमटके, रोशन नाहारकर, आनंद समशेर, मोहित बरसे, संदीप खरे, संतोष मधुमटके, मनोज मधुमटके, गब्बर इंगोले, दिनेश मेथिया, अजय कनोजे, ज्ञानेश्वर वैद्य इतर सर्व कार्यालयीन कर्मचारी त्याचप्रमाणे सर्व सफाई कर्मचारी जयंतीस उपस्थित होते.

# साक्षी वरोकर हीचे स्पर्धा परीक्षेत सुयश व सत्कार

## डॉ.पंजाबराव देशमुख स्पर्धा परीक्षा मंचचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २१ :

डॉ. पंजाबराव देशमुख स्पर्धा परिक्षा मंचाच्या 22 व्या वर्धापन दिन निमित्त स्पर्धा परीक्षेतील यशाबाबत डॉ. के. आर.ठाकरे सभागृह, कृषी महाविद्यालय, अकोला येथे सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यात काटोल येथील साक्षी दिलीपराव वरोकर हीची स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून 'कृषी विस्तार अधिकारी ' पदी निवड झाल्यामुळे शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला कुलगुरू डॉ. एस.आर. गडाख, प्रमुख पाहुणे महाबीज कार्यकारी संचालक योगेश कुंभेजकर (आय ए एस), वनसंरक्षक, नागालँड हेमंत कामडी (आय एफ एस), संशोधन संचालक डॉ. व्ही के खर्चे,असोसिएट डीन डॉ. वाई. बी. तायडे, नियंत्रक प्रमोद पाटील,निर्देश संचालक डॉ. एस. एस. माने, कुलसचिव एस .टी.राठोड, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. एस.एस.हाडोळे प्रामुख्याने उपस्थित होते. काटोलचे साक्षी वरोकर हिने स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून कृषी विस्तार अधिकारी, कृषी सहाय्यक व तलाठी या दोन्ही पदावर सुयश मिळवून नियुक्तीस पात्र ठरली . तिच्या सुयशाबद्दल डॉ.पंजाबराव देशमुख स्पर्धा परीक्षा मंच अकोला तिचे अभिनंदन केलेले आहे.

तालुका कृषी विस्तार अधिकारी साक्षी वरोकर ही आपल्या यशाचे श्रेय सुनीता वरोकर आणि मुख्याध्यापक दिलीप वरोकर यांना देते. सुयशाबद्दल प्राचार्य सुधीर बुटे, विष्णू वडे महाराज, कॉन्ट्रॅक्टर सुनील भोयर, शेषराव टाकरखेडे, आदर्श शिक्षक राजेंद्र टेकाडे, केशव भेलकर, अशोक डांगोरे यांनी साक्षी हिचे अभिनंदन केले.

# देह व्यवसायाचा भंडाफोड

**नागपूर :** कपिलनगरातील एका हॉटेलमध्ये सुरू असलेल्या देह विक्रीच्या अड्ड्यावर गुन्हेशाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने (एसएसबी) धाड मारली. या ठिकाणाहून पोलिसांनी दोन पीडित तरुणींची सुटका केली. महिला दलालासोबतच हॉटेल मालकाविरुध्द कपिलनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पूजा दहीकर (36) रा. नवीन इंदोरा, यशराज चौकसे (29) रा. बेसा अशी आरोपींची नावे आहेत. पूजा ही फरार असून पोलिस तिचा शोध घेत आहेत. पूजाविरुद्ध यापूवीर्ही पीटा ॲक्ट अंतर्गत गुन्ह्याची नोंद आहे. तिचा सर्वत्र संपर्क असून तिने दिल्ली, मुंबईहून तरुणींना देहविक्रीसाठी नागपुरात बोलाविल्याचा खुलासा पोलिस तपासात झाला.

गुन्हेशाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाला माहिती मिळाली की, कपिलनगर परिसरातील ओयो हॉटेल पॅराडाईस स्टे इन, रमाईनगर येथे देहविक्रीचा व्यवसाय सुरू असून दलाल महिलेच्या माध्यमातून मुंबई, दिल्लीतील तरुणींना बोलाविण्यात आले आहे. मुलींना ग्राहकांना उपलब्ध करून देहविक्रीचा व्यवसाय सुरू आहे. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी शुक्रवारला सायंकाळच्या सुमारास धाड कारवाई केली. आरोपी हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पीडित तरुणींना पैशांचे आमिष देत देहव्यवसाय करून घेत असल्याचे लक्षात आले. पोलिसांनी दोन पीडितांची सुटका केली. आरोपींकडून मोबाईलसह रोख 19 हजार 960 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# कुख्यात गुन्हेगार शेख अफसर याला अटक

**नागपूर :** गुन्हे शाखा यूनिट क्रमांक २ ने जिल्ह्यातील एका दर्ग्यात लपून बसलेला कुख्यात गुन्हेगार शेख अफसर उर्फ अंडा शेख युसुफ याला शिताफिने ताब्यात घेवून वाठोडा पोलिसांच्या स्वाधिन केले. पोलिस ठाण्यात दाखल दरोड्याच्या गुन्ह्यात तो फरार होता. त्याच्या विरूद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१० (२), ३५१ (२), ३५२ अन्वये गुन्हे दाखल आहे. या प्रकरणात आरिफ इरफान पठाण (वय २८) याने तक्रार दिली होती.



पोलिस ठाणे वाठोडा नागपूर शहर येथे दाखल उपरोक्त गुन्ह्यातील रेकॉर्ड वरील आरोपी शेख अफसर उर्फ अंडा शेख युसुफ याचा शोध पोलिस घेत होते. त्याचा शोध गुन्हे शाखा यूनिट २ घेत असताना आरोपी कन्हान नदीच्या पुलाजवळ, कामठी रोड येथील जंगलात असलेल्या दर्गामध्ये असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

मिळालेल्या माहिती नुसार गुन्हे शाखा यूनिटच्या अधिकारी व अंमलदार यांनी तिथे जावून त्याला ताब्यात घेतले. व वाठोडा पोलिसांच्या ताब्यात दिले. यापूर्वी गिट्टीखदान पोलिसांनी अफसर अंडा उर्फ शेख अफसर शेख युसूफ याच्या घरावर छापा टाकून सहा काडतुसे जप्त केली होती. तो गांजा व इतर अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी प्रसिद्ध गुन्हेगार आहे.

त्याच्यावर अंमली पदार्थ विक्रीचे डझनभर गुन्हे दाखल आहेत. पूर्वी तो गांजा विकायचा. पण गेल्या काही वर्षांपासून तो मेफेड्रान विकण्यात सक्रिय आहे. अंमली पदार्थांची विक्री केल्याप्रकरणी अफसर अंडा अधिकारी अनेकवेळा तुरुंगात गेला आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# भारतीय वैज्ञानिक संस्कृतीचा ठेवा युवा पिढीकडे सुपूर्त करण्याचा हिंदू रिसर्च फाउंडेशनचा प्रयत्न अभिमानास्पद

## आयआयएमचे संचालक भिमराय मैत्री यांचे गौरोद्गार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २१ :

हजारो वर्षांपूर्वीचा भारतीय वैज्ञानिक संस्कृतीचा ठेवा नवीन युवा पिढीकडे सुपूर्त करून हजारो नव वैज्ञानिकांना प्रोत्साहन देण्याचा हिंदू रिसर्च फाउंडेशन प्रयत्न अत्यंत अभिमानास्पद असून याची जागतिक पातळीवर नोबेल पुरस्कारा सारखी दखल घेतली जाईल, असे गौरोदगार हिंदू रिसर्च फाउंडेशनच्या सप्तर्षी पुरस्कार सोहळ्याप्रसंगी आय.आय.एम. नागपूरचे संचालक भिमराय मैत्री यांनी काढले.

आज नागपूर येथील कवी कुलगुरू कालिदास सभागृहात झालेल्या पुरस्कार सोहळ्यात हिंदू रिसर्च फाउंडेशनच्या वतीने सप्तऋषी पुरस्कार श्रुंखलेतील तृतीय सोहळ्याच्या अध्यक्ष पदावरून ते बोलत होते. यावेळी देशातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामवंत वैज्ञानिक लेखक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांचा सन्मान सोहळा योजण्यात आला होता.

यावेळी भारतरत्न डॉ. सी एन आर राव यांना नागार्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पद्मविभूषण आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांना आचार्य कणाद पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पद्मभूषण डॉ. असलेले भैरप्पा यांना महर्षी वाल्मिकी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. इस्ट्रोचे प्रमुख पद्मश्री एस. अरुण यांना आचार्य भारद्वाज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर यांना आचार्य शुश्रुत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अयोध्येच्या राम मंदिराचे वास्तु विशारद श्री सी बी सोमपुरा यांना विश्वकर्मा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर श्री मोहित जोशी यांना आर्यभट्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उपस्थित सत्कारमूर्तींनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करून हिंदू रिसर्च फाउंडेशनच्या उपक्रमात कौतुक केले.

या सोहळ्यासाठी विशेष अतिथी म्हणून कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. श्री हरे राम त्रिपाठी यांची प्रमुख उपस्थिती होती. पर्सिस्टन्स आयटी पार्क मध्ये झालेल्या कवि कुलगुरू कालिदास सभागृहात या शानदार सोहळ्यासाठी देशभरातील अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदू रिसर्च फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रमुख विश्वस्त, रेड स्वस्तिक सोसायटीचे महा व्यवस्थापक व या उपक्रमाचे संकल्पक पोलीस महासंचालक डॉ.टि.एस. भाल यांनी आपल्या प्रास्ताविकात या उपक्रमाविषयी भूमिका स्पष्ट केले. भारतीय संस्कृती ही मानवतावाद जपणारी जगातली एकमेव संस्कृती असल्याचे प्रतिपादन करून भारतीय ऋषीमुनींनी हजारो वर्षांपूर्वी वैज्ञानिक दृष्टिकोनातून जे जे लिखाण केले, ते पुन्हा जगासमोर आल्यास भारतीय संस्कृतीचा नावलौकिक जगभर होईल, अशी भूमिका मांडली.

यावेळी रेड स्वस्तिकचे अखिल भारतीय अध्यक्ष श्री सुरेश राव कोते महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक डॉ. भूषण कुमार उपाध्याय विशेष पोलीस महानिरीक्षक, दिलीपराव पाटील भुजबळ नागपूरचे सह पोलीस आयुक्त संजय पाटील, अर्जुन घुगल, भगवान राऊत, प्रशांत हरताळकर, अशोक शिंदे, हेमंत गोरे, मोहन वर्दे, जे.बी. पाटील, प्रमोद नांदगावकर, सोपानराव कासार, भास्कर काळे प्रकाश आडेलकर यांचेसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

हा शानदार सोहळा यशस्वी करण्यासाठी हर्ष देशमुख,जगन्नाथ गराट, ज्ञानदीप पाटील, श्री निशांत देवतळे, अभिषेक चाचा, सचिन भामरे, श्रीकृश्णा भाल, संजय बेंडे, मैत्रेय परिवार संस्था, विश्व मांगल सभा या परिवाराचे सर्व मान्यवरांनी विशेष परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे संचालन गोवा येथील डॉ. अनिता तिळवे व देशपांडे यांनी केले.

# जागतिक दर्जाचे शिक्षण द्या : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २१ :



मुलांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण द्या. त्यांना स्पर्धेच्या युगातील प्रत्येक नवी गोष्ट शिकवा. पण त्याचवेळी संस्कार आणि मूल्यांचेही शिक्षण द्या, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (रविवार) येथे केले.

पूर्व विदर्भ महिला परिषदेच्या वतीने उत्तर अंबाझरी मार्गावर आयोजित कार्यक्रमात नितीन गडकरी बोलत होते. विबग्योर समूहाच्या शाळेचे उद्घाटन ना. श्री. गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी काळे फाऊंडेशन ट्रस्टचे विलास काळे, संस्थेच्या अध्यक्ष नीलिमा शुक्ल, उपाध्यक्ष नूतन कोलसकर, सीईओ किरणजित पन्नू आदींची प्रमुख उपस्थिती होती. ना. श्री. गडकरी म्हणाले, ह्यनागपुरात एक उत्तम शिक्षण संस्था सुरू होत आहे, याचा आनंद आहे.

पण आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शिक्षणासोबत मूल्याधिष्ठित शिक्षणही काळाची गरज आहे. संस्कार देणेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

चांगला माणूस कसा घडवता येईल, याचा विचार करावा लागेल. कारण मूल्य आणि संस्कार हीच आपली जमेची बाजू आहे. हे सारे शिक्षणातून देणेच शक्य आहे. आज देशाला कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची गरज आहे. देशाच्या विकासात त्यांचे मोठे योगदान राहणार आहे. असे मनुष्यबळ चांगल्या आणि दजेर्दार शिक्षणातून निर्माण होईल, असेही गडकरी म्हणाले.

नागपुरात आता एज्युकेशन हब म्हणून नावारुपाला येत आहे. अनेक मोठ्या शैक्षणिक संस्था नागपुरात आल्या आहेत. पारडी येथे ११० एकरमध्ये सिम्बायोसिस आले आहे.

त्याच्याच शेजारी ४९ एकरमध्ये नरसी मोनजी ही प्रतिष्ठित शिक्षण संस्था येत आहे. याशिवाय इंटरनॅशनल लॉ स्कूल, आयआयएम, ट्रिपल आयटी सुद्धा नागपुरात आहे, याचाही नितीन गडकरींनी आवर्जून उल्लेख केला.

## २ वाहन चोर पोलिसांच्या जाळ्यात

**नागपूर :** गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकाने गोपनिय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या माध्यमातून दोन वाहन चोरांना अटक केली. दोघांनीही वेगवेगळ्या परिसरातून तीन वाहन चोरी केल्याची कबुली दिली. नेहाल शेख आबिद शेख (21) रा. सतरंजीपुरा आणि आर्यन राजन भैसारे (22) रा. खलासी लाईन अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

गत 11 ऑक्टोबरच्या रात्री शांतीनगरच्या तेलीपुरा पेवठा परिसरात राहणाऱ्या विनोद वराडे यांची मोटारसायकल घरासमोरून चोरी झाली होती. शांतीनगर पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासली असता वरील आरोपी वाहन चोरी करताना दिसले.

## मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहाय्यक शिक्षकावर गुन्हा दाखल

**नागपूर :** निवडणूक कामात कसूर केल्याबद्दल मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहाय्यक शिक्षक जयप्रकाश हेडाऊ यांच्यावर कारवाई करण्यात आली असून त्यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीत प्राथमिक टप्प्यात ८५ पेक्षा अधिक वय आहे अशा ज्येष्ठ नागरिकांना व दिव्यांग मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. ही जबाबदारी सोपविण्यात आलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहाय्यक शिक्षक जयप्रकाश हेडाऊ यांनी अधिकृत कर्तव्याचे पालन न केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध लेखी तक्रार दाखल झाली. या तक्रारी अन्वये सावनेर येथील पोलिस स्टेशनमध्ये लोकप्रतिनिधीत्व अधिनियमान्वये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावनेरचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रविंद्र होळी यांनी सावनेर पोलिस ठाण्यात सदर तक्रार दाखल केली. नगर परिषदेची सुभाष प्राथमिक शाळा, सावनेर येथील सहाय्यक शिक्षक जयप्रकाश जगराम हेडाऊ यांची यादी भाग क्रमांक १३५ करीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात आली होती. या क्षेत्राचे तलाठी तथा पर्यवेक्षक यांनी १२-ड फॉर्म भरून घेण्यास सांगितले असता हेडाऊ यांनी सदर काम करण्यास स्पष्ट नकार दिला. आदेश घेण्यास त्यांनी नकार दिला. अरेरावीचे असभ्य वर्तणूक केली. यामुळे ही तक्रार दाखल करण्यात आली होती.

निवडणूक कामाच्या आदेशाचे पालन करण्याच्या त्यांना वारंवार सूचना देवूनही त्यांनी आपल्या कर्तव्यात टाळाटाळ केली. याबाबत उपविभागीय अधिकारी संपत खलाटे यांनी समज देवून पाहिली. त्यांना वाजवी संधी देवूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याचे खलाटे यांनी सांगितले. निवडणूक विभागातर्फे सुपूर्द करण्यात आलेली जबाबदारी ही राष्ट्रीय कर्तव्याचा भाग आहे. याच बरोबर कोणताही शासकीय कर्मचारी हा राजकीय प्रचारात सहभागी होता कामा नये. याबाबत निवडणूक विभागामार्फत स्वयंस्पष्ट आदेश जारी केले आहे. आपली जबाबदारी टाळण्यासाठी कोणीही आदेश रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास नियमानुसार कारवाई अटळ असल्याचा इशारा जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी दिला.

# जे.जे. गोळीबार प्रकरणी प्रमुख आरोपीला अटक

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :

जे. जे. रुग्णालयामध्ये १९९२ मध्ये झालेल्या गोळीबार प्रकरणातील प्रमुख आरोपी त्रिभुवन सिंह (६२) याला गुन्हे शाखेने अटक केली. बहिण हसिना पारकरचा पती इब्राहिम पारकर याच्या हत्येचा सूड घेण्यासाठी कुख्यात दाऊद इब्राहिमने जे.जे. रुग्णालयात गोळीबार घडवून आणला होता.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, त्रिभुवन सिंहा हा जे.जे. गोळीबार प्रकरणातील प्रमुख आरोपी आहे. त्याला अटक करण्याची प्रक्रिया यापूर्वी सुरू करण्यात आली होती. अखेर त्याला पकडण्यात पोलिसांना यश आले. याप्रकरणात सुभाष सिंह ठाकूर आणि ब्रिजेश सिंह यांचा समावेश आहे. सिंहच्या चौकशीतून याप्रकरणाशी संबंधित माहिती पोलिसांना मिळणार आहे.

हसिना पारकरचा पती इब्राहिम पारकर २६ जुलै १९९२ रोजी नागपाडा येथील जयराम लेन येथे त्याच्या हॉटेलमध्ये बसला असताना गवळी टोळीतील शैलेश हळदणकर व बिपीन शेरे यांनी त्याच्यावर गोळीबार केला. त्यावेळी आरडाओरड झाली. पळून जाणाऱ्या हळदणकर व शेरेला स्थानिक रहिवाशांनी बेदम मारहाण केली. त्यात जखमी झाल्यामुळे दोघांना जे. जे. रुग्णालयातील कक्ष क्र. १८ मध्ये भरती करण्यात आले होते.

बहिणीच्या पतीचा हत्येचा सूड घेण्यासाठी १९९२ मध्ये कुख्यात गुंड दाऊद इब्राहिमने सर जे.जे. रुग्णालयात आरोपींना मारण्याचा कट रचला. जे. जे. रुग्णालयाच्या पहिल्या मजल्यावरील १८ क्रमांकाच्या कक्षात सप्टेंबर १९९२ मध्ये दाऊद टोळीचे गुंड शिरले. तत्पूर्वी एका महिलेने या कक्षाची पाहणी केली होती. कक्षात किती सुरक्षा रक्षक आहेत, शेरे व हळदणकर कोठे उपचार घेत आहेत.

त्यानंतर मध्यरात्री दाऊदच्या टोळीतील सुनील सावंत, सुभाषसिंह ठाकूर, श्यामकिशोर गारिकापट्टी यांच्यासह इतर गुंड रुग्णालयात घुसले व त्यांनी बेछुट गोळीबार केला. या हल्ल्यात शैलेश जागीच ठार झाला. तर शेरे गंभीर जखमी झाला. यावेळी सुरक्षेला तैनात पोलीस शिपाईल चिंतामण जयस्वाल व केवलसिंह भानावत यांचाही मृत्यू झाला. या हल्लात वैद्यकीय कर्मचाऱ्यासह पाच जण जखमी झाले.

# पिस्तूल बाळगणारा सराइत गजाआड

**पुणे :** पिस्तूल बाळगणाऱ्या सराईताला सिंहगड रस्ता पोलिसांनी हिंगणे परिसरातून अटक केली. त्याच्याबरोबर असलेल्या दोन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून दोन पिस्तूल आणिचार जिवंत काडतूसे जप्त करण्यात आली आहेत. राज रवींद्र जागडे (वय २२, रा. वडगाव बुद्रूक, सिंहगड रस्ता) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

जागडे सराइत गुन्हेगार आहे. हिंगणे परिसरातील कॅनोल रस्त्यावर तिघे जण थांबले असून, त्यांच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. सहायक निरीक्षक सचिन निकम, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, स्वप्नील मगर, विनायक मोहीते, शिवाजी क्षीरसागर यांच्यासह पथकाने सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले.

पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राघवेंद्रसिंह क्षीरसागर, गुन्हे शाखेचे निरीक्षक उत्तम भजनावळे आणि पथकाने ही कारवाई केली. दोन दिवसांपूर्वी गुलटेकडीतील डायस प्लॉट परिसरात बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्या गुंड सज्जन सुनील जाधव (वय १९, रा. डांगे चौक, पिंपरी, मूळ रा. रेणुशीमोरा, महाबळेश्वर, जि. सातारा) याला गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले.



नागपूर : दिवाळीचा सण म्हणजे प्रकाशाचे पर्व विविध रंगी प्रकाशाने चकाकी येत असताना घरोघरी मातीच्या पणत्यांचे महत्त्व अजूनही कायम आहे. नागपुरातील शहीद चौक कॉटन मार्केट मैदान वर परंपरागत मातीच्या पणत्यांची दुकाने सजली आहेत. विविध आकारातील पणत्या बाजारात उपलब्ध आहेत. उपराजधानीत राजस्थान गुजरात, जबलपूर अशा विविध राज्यातून आकर्षक डिझाईनच्या पणत्या ग्राहकांना आकर्षित करीत आहे. मातीच्या पणत्यांची किंमत मागील वर्षीपेक्षा २० ते २५ टक्के महाग असूनही मागणी मात्र कायम आहे, हे विशेष.

# राज्यातील मतदारसंघात मतदार यादीत भाजपचा घोळ

## पराभवाच्या मानसिकतेतून मविआचे आरोप : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २१ :



महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीत होणारा पराभव स्पष्ट दिसू लागल्याने मतदार याद्यात घोळ केल्याचा आरोप पराभूत मानसिकतेमधून केला जात असल्याचा दावा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. एरव्ही ईव्हीएमवर बोलणारे मविआचे नेते आता मतदार यादीवर बोलू लागले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. ते नागपूरच्या कोराडी येथे माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महाविकास आघाडीमध्ये वाद असून केवळ भाजपा आणि महायुतीचा विरोध करण्यासाठी एकत्र आले आहेत. त्यांच्याकडे कोणतीही विचारधारा नाही. मविआचे देशासाठी समर्पण नाही, अजेंडाही नाही. निव्वळ जाती-पातीचे राजकारण करून सामाजिक वाद निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. दिवसभर राजकारण आणि फेक नॅरेटिव्ह पसरविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. एक दिवस असा येईल, की ज्या दिवशी मविआमधील सर्व उमेदवारीसाठी मारपीट करतील. दुसरीकडे भाजपा-महायुती विचारधारेतून आणि महाराष्ट्राच्या विकासाचा अजेंडा घेऊन काम करीत आहे.

2024 च्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी नावे मोठ्या संख्येत गहाळ झाल्याचे उघड झाले होते. महाराष्ट्रात अशा मतदारांची संख्या मोठी होती. ही नावे का गायब झाली? कशी गायब झाली? कुणाच्या आदेशाने गायब झाली? या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी यासाठी भाजपाच्या शिष्टमंडळाने माझ्या नेतृत्वात केंद्रीय निवडणूक आयोगाची भेट घेतली होती. तेव्हा मविआचे नेते का चुप्प होते? तेव्हा हा प्रश्न का उपस्थित केला नाही?, असाही प्रश्न त्यांनी विचारला. आता कॉंग्रेस घाबरली आहे.

लोकशाही मजबूत करण्यासाठी आम्ही अधिकाधिक मतदान करा,असे जनतेला आवाहन करणार असल्याचे ते म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांच्यासह मी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. त्यांनी काही जागांवरती आम्हाला मार्गदर्शन केले असून, गडकरी महाराष्ट्राच्या निवडणुकीसाठी पूर्णवेळ प्रचार करणार आहेत, अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

# पिढ्यापिढ्यांचे संचित जतन करणारे अमूल्य लिखाण : डॉ. नितीन पाटील

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २१ :



## पुरुषोत्तम कुलकर्णी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

पशुवैद्यक विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता असलेले, डॉ.पुरुषोत्तम कुळकर्णी यांच्या 'पाऊलखुणा' या मराठी पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद 'फुट प्रिंट्स ऑन सँडस ऑफ टाइम' चे प्रकाशन १९ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ.नितीन पाटील यांच्या हस्ते शुभमंगल कार्यालय येथे पार पडले. विशेष अतिथी व भाष्यकार म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री व लेखिका मनीषा अतुल उपस्थित होत्या.

या प्रसंगी बोलतांना डॉ. नितीन पाटील म्हणाले, डॉ.कुळकर्णी यांचे पुस्तक म्हणजे पशुवैद्यक शास्त्रज्ञांना मार्गदर्शनपर ठरणारे महत्वाचे लिखाण आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि संशोधनाचा फायदा पशुवैद्यक क्षेत्रातील जागतिक समस्यांच्या निराकरणासाठी निश्चितच करून घेता येईल. तसेच ग्रंथावर भाष्य करताना मनीषा अतुल यांनी हे एक महत्वाचे आत्मचरित्र असल्याचे सांगितले. वाचकांना अज्ञात असलेल्या पशुवैद्यकशास्त्रातल्या एका निराळ्या अनुभवविश्वाचा प्रत्यय आणि भारताच्या गेल्या दीडशे वर्षांच्या परिवर्तनाचा तपशील, त्यांच्या या आत्मचरित्रपर पुस्तकातून मांडल्या गेला आहे असे त्या म्हणाल्या. या प्रसंगी पुस्तकाचे अनुवादक श्री आप्पासाहेब चापोरकर यांनी डॉ. कुलकर्णी यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडून दाखविले. ते म्हणाले हा ग्रंथ म्हणजे भारतीय संस्कृतीचे मूल्यसंवर्धन करण्याकरिता अनेक पिढ्यांना दिशा देणारा दिपस्तंभ आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सुनील कुलकर्णी व डॉ. शिरीष उपाध्ये, अधिष्ठाता, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी केले. तर आभारप्रदर्शन अचला कुलकर्णी यांनी केले. या प्रसंगी सोहळ्यात अनेक क्षेत्रातील मान्यवर डॉ. दांडगे, माजी कुलसचिव आणि अधिष्ठाता, डॉ. मारूडवार, डॉ. गहलोद व कुलकर्णी परिवारातील सदस्य उपास्थित होते.